दैनिक

जनप्रभात

सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

मुख्य संपादक :- राहुल गजरे

कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे


✻ (आष्टी) वर्धा ✻ बुधवार, दि.७ मे २०२५ ✻ वर्ष ३ रे ✻ अंक १९८ ✻ पृष्ठ ६ ✻ मुल्य ५.०० RNI NO : MAHAR/2020/82242

राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेस २० मेपर्यंत मुदतवाढ

दिलीप येवले, नागपूर: सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत प्रतीवर्षी अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील मुलामुलींना परदेशामध्ये अध्ययन करण्यासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेंतर्गत शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील विद्यार्थ्यांना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी या शिष्यवृत्ती योजनेंतर्गत अर्ज सादर करण्यास २० मेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.असे आहेत पात्रतेचे निकष विद्यार्थी अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील असावा. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा. विद्यार्थ्याच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाखापेक्षा जास्त नसावे. अधिक माहितीसाठी www.maharashtra.gov.in संकेतस्थळास भेट द्यावी. या योजनेचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी केले आहे.

मत्स्यव्यवसाय विभाग आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक : मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे

वृत्तसंस्था ■ पुणे



पुणे : राज्यातील मत्स्यव्यवसाय विभाग महत्त्वाचा विभाग असून हा विभाग आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी अधिकाऱ्यांनी एकत्रिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. उत्पन्नवाढीसोबतच पश्चिम महाराष्ट्रातील मत्स्य उत्पादन वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन मत्स्यव्यवसाय व बंदरे विभागाचे मंत्री नितेश राणे यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात मत्स्यव्यवसाय विभागाची विभागस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली होती त्यावेळी श्री. राणे बोलत होते.

बैठकीला जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मत्स्यव्यवसाय विभागाचे आयुक्त श्री. किशोर तावडे (भा.प्र.से.), विभागाचे प्रादेशिक उपायुक्त विजय शिखरे, विभागातील पाचही जिल्ह्यांचे सहायक आयुक्त उपस्थित होते.

श्री. राणे पुढे म्हणाले, पश्चिम महाराष्ट्रात मत्स्य व्यवसायाला पूरक वातावरण असून या भागातील शेतकरी प्रगतशील आहेत त्यांचा या व्यवसायात सहभाग वाढविल्यास मत्स्य उत्पादन वाढू शकते. विभागातील अधिकाऱ्यांनी आपापसात समन्वय ठेऊन पारदर्शकपणे काम करावे. विभागाचे आर्थिक स्त्रोत वाढवून विभाग आर्थिक स्वावलंबी व मोठा झाला पाहिजे. यासाठी नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्याबरोबरच एआय तंत्रज्ञानाचा वापर विभागात सुरू करण्यासाठी सुद्धा प्रयत्न करावेत.

आंध्र प्रदेश, केरळ या राज्यात सुरू असलेले मत्स्य उत्पादन वाढीसाठी उपक्रमांची माहिती घेऊन आपल्या राज्यात सुद्धा नवीन उपक्रम राबविण्यासाठी अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत. आगामी काळात तलावातील गाळ काढण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम हाती घेऊन सर्व तलावांमधील गाळ काढावेत. त्यामुळे निश्चितच मत्स्य उत्पादनात वाढ होईल. आता मत्स्य व्यवसायाचा समावेश शेती उद्योगात झाला असून या व्यवसायासाठी पाणी उपलब्ध करुन घेण्याच्या दृष्टीने नियोजन करावे. मत्स्य उत्पादन भागातील पाण्यातील प्रदूषण दूर करण्यासाठी संबंधित विभागाशी संपर्क करुन पाणी शुद्ध कसे करता येईल यासाठी नियोजन करावे.

विभागातील ज्या जिल्ह्यांमध्ये मच्छी मार्केटसाठी जागा उपलब्ध नाही त्या जिल्ह्यांनी नवीन मच्छी मार्केटसाठी महानगरपालिकेकडून जागा उपलब्ध करुन घेण्यासाठी पाठपुरावा करावा. जुनी मच्छी मार्केट नादुरुस्त स्थितीत असल्यास त्यासंदर्भातील दुरुस्तीचे प्रस्ताव विभागामार्फत मंत्रालय स्तरावर सादर करावेत. कोल्ड स्टोरेजसह सर्व सुविधांचा समावेश प्रस्तावात असला पाहिजे. आलेल्या प्रस्तावांना मान्यता देऊन त्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

तलावातील मासेमारीच्या ठेकेदारांवर नियंत्रण ठेवणे गरजेचे असून ठेकेदार स्वतः काम पाहतात का याची तपासणी करावी. जे ठेकेदार निकषात बसत नाहीत त्यांचे ठेके रद्द करावेत. नदी भागात मासेमारीच्या ठेक्यांबाबत धोरण निश्चित करण्यासाठी समिती स्थापन करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. उजणी धरणातील अवैधरीत्या सुरू असलेली मासेमारी बंद करुन तेथील स्थानिक लोकांना व्यवसायासाठी प्राधान्य देण्यात यावे. उजणी धरणाची मत्स्य उत्पादन क्षमता चांगली असून तेथून उत्पादन कसे वाढेल यासाठी विभागाने लक्ष घालावे, असे त्यांनी सांगितले.

पुण्यातील हडपसर येथे चांगल्या प्रकारचे आधुनिक मत्स्यालय उभारण्याच्या दृष्टीने बैठकीत चर्चा करण्यात आली.बैठकीला पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर जिल्ह्यातील विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

माहिती अधिकार कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणार : राज्य माहिती आयुक्त गजानन निमदेव

वृत्तसंस्था ■ नागपूर



नागपूर : गत ३४ वर्षापासून पत्रकार ते संपादक म्हणून प्रदीर्घ अनुभव असलेले गजानन निमदेव यांनी आज राज्य माहिती आयुक्त (नागपूर खंडपीठ) पदाची जबाबदारी स्वीकारली. राज्य शासनाने त्यांची नुकतीच या पदावर निवड केली आहे. माहिती अधिकार कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करु असे त्यांनी सांगितले. आज दिनांक ५ मे रोजी सकाळी ११ वाजता प्रशासकीय इमारत, सिव्हिल लाईन्स येथील कार्यालयात त्यांनी कामकाजास प्रारंभ केला. कार्यालयातील कर्मचारी, अधिकारी व पत्रकार बांधवांनी त्यांना प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा दिल्या.

नागपूर विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष रमेश कुलकर्णी यांनी त्यांचे स्वागत केले. दैनिक तरुण भारत या मराठी दैनिकात त्यांनी पत्रकार, प्रशिक्षणार्थी उपसंपादक या पदापासून पत्रकारितेला प्रारंभ केला. जवळपास गेली पंधरा वर्षे संपादक म्हणून त्यांनी दैनिक तरुण भारतची जबाबदारी समर्थपणे पार पाडली. नागपुरात काम करणाऱ्या बुलडाणा जिल्हा नागरिक मंडळाचा स्व. शक्तीकुमार संचेती स्मृती पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा राष्ट्रपिता महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार, ज्येष्ठ नागरिक महामंडळ विदर्भ यांचा आप्पासाहेब पाडळकर स्मृती पत्रकारिता पुरस्कार, बुलडाणा जिल्ह्यातील मेहकर येथील सत्यजित गौरव पुरस्कार, नागपुरातील प्रतिष्ठेचा मानला जाणारा स्व. अनिलकुमार पत्रकारिता पुरस्कार यासह एकूण ७ पुरस्कारांनी निमदेव यांना सन्मानित केले आहे.सरकारी नोकऱ्यांसाठी घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन करण्याची त्यांनी विशेष आवड जपली आहे. याच आवडीतून निमदेव यांनी सातत्याने २० वर्षे स्तंभलेखन केले. याचबरोबर स्पर्धा परीक्षांसाठी निःशुल्क मार्गदर्शन केले, हे विशेष. हजारो विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेतला. एमपीएससीच्या परीक्षांसाठी सात पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. सामाजिक, आर्थिक, राजकीय विषयांवर स्वतंत्रपणे हजारपेक्षा जास्त लेख लिहिले आहेत. आठशेपेक्षा जास्त अग्रलेख लिहिले आहेत. इंग्रजी आणि हिंदीतील साडेतीन हजार लेखांचे भाषांतर करण्याचा अनुभव त्यांनी संपादित केलेला आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना मुख्यमंत्र्यांसह मंत्रिपरिषद सदस्यांचे अभिवादन: युवराज यशवंतराव होळकर यांचीही उपस्थिती

वृत्तसंस्था ■ अहिल्यानगर



अहिल्यानगर : जिल्ह्यातील चौंडी येथे होणाऱ्या मंत्रिपरिषद बैठकीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह संपूर्ण मंत्रिमंडळ चौंडीत दाखल झाले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी मंत्रिमंडळ सदस्यांसह पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक परिसराला भेट देऊन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन केले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, होळकर घराण्याचे १६ वे वंशज युवराज यशवंतराव होळकर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक समितीचे अध्यक्ष अण्णासाहेब डांगे आदींसह मंत्रिमंडळ सदस्य उपस्थित होते.

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक आणि त्याच परिसरात असलेल्या महादेव मंदिरात जाऊन दर्शन घेतले.

स्मारक परिसरात सुरू असलेले गढीचे नूतनीकरण, नक्षत्र उद्यान, संरक्षक भिंत, शिल्प, संग्रहालय, शिवसृष्टी या प्रगतीपथावरील कामांची पाहणी मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे निवास, स्वयंपाकघर, देवघर, ओसरी, तुळशी वृंदावन, बैठकीचे ठिकाण, धान्य साठविण्याचे ठिकाण, दरबार या स्थळांची पाहणीही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी केली. सभापती प्रा. शिंदे यांनी याबाबतची माहिती मुख्यमंत्र्यांना दिली.

ढोलताशांच्या गजरात स्वागत

मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह मंत्रिमंडळ सहकाऱ्यांचे अहिल्यादेवी स्मारक परिसरात आगमन होताच धनगरी ढोल पथकाने ढोल गजर केला. सुवासिनिंनी सर्व मंत्र्यांचे औक्षण केले.

इंटरनेट ऑफ थिंग्ज तंत्रज्ञानामुळे कार्यक्षमता वाढण्यास मदत होणार : नॅसकॉमचे तज्ज्ञ रवींद्र देशपांडे

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई: इंटरनेट ऑफ थिंग्ज तंत्रज्ञानामुळे शासनाच्या विविध सेवांमध्ये गतिमानता येऊन कार्यक्षमता वाढीस लागणार आहे. तसेच नागरिकांचे जीवनमान सुधारण्यास मदत होणार असल्याचे प्रतिपादन नॅसकॉमचे सिस्टिम इंटिग्रेशन तज्ज्ञ रवींद्र देशपांडे यांनी केले.

सामान्य प्रशासन विभागातर्फे प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्यामध्ये प्रशिक्षण संस्कृती निर्माण करण्यासाठी 'टेक वारी : महाराष्ट्र टेक लर्निंग वीक' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत 'इंटरनेट ऑफ थिंग्ज' या विषयावर श्री. देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी उपसचिव दिलीप देशपांडे, अवर सचिव स्मिता जोशी यांच्यासह विविध विभागातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

इंटरनेट ऑफ थिंग्ज हे इंटरनेटसेवेवर आधारित असून याद्वारे रिअलटाईम लक्ष ठेवून एखादे काम परिपूर्ण करता येते. स्मार्ट सिटीमधील वाहतूक संचालन, पाण्याचे नियोजन, रस्त्यांची देखभाल दुरुस्ती, वाहनतळ नियोजन, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक सुरक्षा प्रणाली आदीसाठी इंटरनेट ऑफ थिंग्ज तंत्रज्ञानाचा वापर करता येतो. त्याचप्रमाणे कृषी, औद्योगिक क्षेत्रातही इंटरनेट ऑफ थिंग्ज तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात उपयोग होत असल्याचेही त्यांनी यावेळी उदाहरणांसह सांगितले.

इंटरनेट ऑफ थिंग्ज तंत्रज्ञानाचा वापर करताना सायबर सुरक्षा देखील महत्त्वाची आहे. इंटरनेट ऑफ थिंग्ज तंत्रज्ञानाद्वारे इंटरनेटवर माहिती पाठविली जात असल्याने सायबर सुरक्षाविषयक संभाव्य जोखीमही पहावी, असेही श्री. देशपांडे यांनी सांगितले.उपसचिव श्री. देशपांडे व श्रीमती जोशी यांनी स्वागत केले.

'भाषिणी' च्या माध्यमातून आता विविध भाषातील संवाद सुलभ होणार : अमिताभ नाग

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानावर आधारित 'भाषिणी' हा संवादाचा नवीन सेतू ठरत आहे. 'भाषिणी' च्या माध्यमातून संवादासाठी भाषा-भाषांमधील अंतर कमी होऊन नागरिकांचा अन्य भाषेतील संवाद अधिक सुलभ होईल, असे प्रतिपादन डिजिटल इंडिया भाषिणी विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमिताभ नाग यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागातर्फे प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्यामध्ये प्रशिक्षण संस्कृती निर्माण करण्यासाठी 'टेक वारी : महाराष्ट्र टेक लर्निंग वीक' या उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमात डिजिटल इंडिया भाषिणी विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमिताभ नाग यांनी भाषिणी- भाषेचा अडसर दूर करणे या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी महाराष्ट्र सदनच्या निवासी आयुक्त आर. विमला, मराठी भाषा विभागाचे सचिव किरण कुलकर्णी आदी उपस्थित होते.

'भाषा इंटरफेस फॉर इंडिया' या संकल्पनेवर आधारित 'भाषिणी' प्रकल्प सुरू करण्यात आला असल्याचे सांगून श्री. नाग म्हणाले, 'एआय' आधारित तंत्रज्ञानाचा वापर करून एक सर्वंकष संवादव्यवस्था उभी केली जात आहे. ' भाषिणी' च्या माध्यमातून नागरिक संवादासाठी केवळ मजकूर नव्हे तर थेट आवाजातून आवाजात भाषांतर करू शकतील असेही त्यांनी सांगितले.

'भाषिणी' मध्ये ऑडिओ-टू-टेक्स्ट, टेक्स्ट-टू-ऑडिओ, टेक्स्ट ट्रान्सलेशन अशा सुविधा देण्यात आल्या आहेत. केवळ मजकुराचे नाही तर आवाजावरून थेट आवाजात भाषांतरही शक्य झाले असल्याने एक व्यक्ती एका भाषेत बोलल्यास, समोरची व्यक्ती तो संवाद दुसऱ्या भाषेत सहज समजू शकतो, असे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. नाग यांनी सांगितले.

शासकीय योजनांची माहिती, हेल्पलाईन सेवा, शिक्षणविषयक साहित्य हे सर्व भाषिणीच्या मदतीने प्रादेशिक भाषांमध्ये उपलब्ध होणार असल्याने योजनांचा लाभ मिळण्यास निश्चित उपयोग होईल, असेही त्यांनी सांगितले.

पारंपरिक खाद्यसंस्कृती डिजिटल माध्यमातून नव्या पिढीकडे पोहोचविण्याचा प्रयत्न : मधुरा बाचल

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : सध्याच्या काळात तंत्रज्ञानाचा प्रभाव सर्वच क्षेत्रांवर पडत असताना, आता पारंपरिक खाद्यसंस्कृती जपण्यासाठीही डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर केला जात आहे. आपल्या आजी, आईकडून शिकलेले पारंपरिक पदार्थ, मराठी खाद्यसंस्कृती नव्या पिढीला डिजिटल भाषेत सांगणे काळाची गरज आहे, असे मधुरा'ज रेसिपी, चॅनेलच्या प्रमुख मधुरा बाचल यांनी सांगितले.

टेक-वारी कार्यक्रमाच्या निमित्ताने मंत्रालयात 'प्रवास पाककृतींचा' या विषयावर मधुरा बाचल यांचे व्याख्यान झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या.

मधुरा बाचल म्हणाल्या, नोकरी किंवा व्यवसायात टिकण्यासाठी तंत्रज्ञानाचे सर्व पैलू आत्मसात करणे आवश्यक आहे. माझ्या यशस्वी प्रवासामध्ये डिजिटल कौशल्यांचा फार मोठा वाटा आहे. मराठी खाद्यसंस्कृती खूप समृद्ध आहे. आजवर मी तीन हजार पेक्षा अधिक रेसिपी पोस्ट केल्या असून, बँकेतील नोकरी सोडून पाककलेच्या प्रवासाला सुरुवात केली. २००९ मध्ये 'मधुरा रेसिपीज' या डोमेनची नोंदणी केली आणि कंटेंट रायटिंग, एडिटिंगसारखी कौशल्ये आत्मसात केली. मागील १७ वर्षांपासून हा प्रवास सुरू आहे, असेही त्यांनी सांगितले.

कोणत्याही व्यवसायात मार्केटिंग महत्त्वाची भूमिका बजावते. आज तंत्रज्ञानाच्या युगात 'एआय' टूल्समुळे व्यवसाय आणि नोकरी करणे अधिक सुलभ झाले आहे. मात्र, यशस्वी होण्यासाठी कौशल्य आणि आवड दोन बाबी महत्त्वाच्या आहेत. स्वतःचे अस्तित्व निर्माण करून टिकवून ठेवण्यासाठी सातत्य आवश्यक असून, यासाठी 'प्लॅन बी' आणि 'प्लॅन सी' देखील तयार ठेवावेत. आपल्या कार्याला अधिक व्यापक व्यासपीठ मिळावे म्हणून त्यांनी यावर्षी जानेवारी महिन्यात 'मधुरा रेसिपीज क्लब' सुरू केला आहे. सोनी मराठीवर आज काय बनवू या? ५ मेपासून या कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

आपली खाद्यसंस्कृती ही केवळ चवीनुसार नसून, ती आरोग्यदायी जीवनशैलीचा एक महत्त्वाचा भाग आहे. पारंपरिक धान्यांमध्ये असलेल्या पोषणमूल्यांचा उल्लेख करत त्यांनी ज्वारी, बाजरी, नाचणी यासारख्या अन्नधान्यांचा नियमित आहारात समावेश करण्यावर भर दिला. आपण जे खातो तेच आपल्या संस्कृतीचे प्रतिबिंब असतं आणि ती चव पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे हीच आपली जबाबदारी आहे. मराठी पारंपरिक खाद्यसंस्कृतीचा गोडवा आता केवळ स्वयंपाकघरापुरता मर्यादित न राहता डिजिटल माध्यमांतून जगभर पोहोचू लागला आहे. मराठी पदार्थांच्या रेसिपीज यूट्यूब, इन्स्टाग्राम आणि फेसबुकसारख्या माध्यमांद्वारे रोज शेकडो लोक बनवण्यास शिकत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

मुख्य निवडणूक आयुक्तांचा बहुजन समाज पक्षाच्या प्रतिनिधींशी संवाद

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू व डॉ. विवेक जोशी यांनी निवडणूक सदन येथे बहुजन समाज पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा कु. मायावती यांच्या नेतृत्वाखालील प्रतिनिधींशी संवाद साधला.

भारत निवडणूक आयोगाने विविध हितधारकांशी सातत्यपूर्ण व व्यापक संवाद साधण्यावर भर दिला आहे. त्याच अनुषंगाने आयोगाने राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील राजकीय पक्षांशी थेट संवाद सुरू केला आहे. या संवादाद्वारे राष्ट्रीय व राज्य पातळीवरील पक्षाध्यक्षांना आपल्या सूचना थेट आयोगापर्यंत पोहोचवता येतील, यासाठी ही एक महत्त्वाची संधी ठरणार आहे.

सर्व संबंधित पक्षांच्या सहकार्याने विद्यमान कायदेशीर चौकटीत राहून निवडणूक प्रक्रियेला अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने आयोगाने हा पुढाकार घेतला आहे.आयोगामार्फत आतापर्यंत ४,७१९ सर्वपक्षीय बैठकांचे आयोजन करण्यात आले. ज्यामध्ये ४० मुख्य निवडणूक अधिकारी, ८०० जिल्हा निवडणूक अधिकारी आणि ३८७९ मतदार नोंदणी अधिकारी यांनी सहभागी होऊन २८ हजारांहून अधिक राजकीय प्रतिनिधींशी संवाद साधला आहे, असे भारत निवडणूक आयोगाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

संपादकीय...

माफी आणि मौन !

माफी मागावी अशा कृत्यांस जबाबदार असलेले जनतेची माफी मागण्याइतका मनाचा उमदेपणा दाखवतात का, हा खरा प्रश्न. राहुल गांधींवरील टीका रास्त ठरावी असे त्यांचे राजकीय प्रमाद अनेक असताना, अमेरिकेत शिखांची माफी मागावी लागल्याबद्दल झोड उठवणे बरे नाही. शीख फुटिरतावाद, त्यातून निर्माण झालेली स्वतंत्र खलिस्तानची चळवळ हा भारतीय राजकारणातील एक काळाकुट्ट अध्याय. क्षणिक आणि तात्पुरत्या राजकीय फायद्यासाठी धार्मिक कट्टरपंथीयांस जवळ केले की काय होते याचा तो मूर्तिमंत आणि अत्यंत हिंसक धडा. त्याची परिणती माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येत झाली. त्याआधी या शीख दहशतवाद्यांच्या भस्मासुराचा बीमोड करण्यासाठी श्रीमती गांधी यांच्यावर अमृतसर येथील सुवर्ण मंदिरात लष्कर पाठवण्याची वेळ आली. शीख फुटिरतावाद्यांचा नेता जर्नेलसिंग भिंद्रनवाले हा सुवर्ण मंदिरात दडून बसलेला होता. त्यास नेस्तनाबूत केल्याखेरीज या खलिस्तानी चळवळीचा अंत होणे अवघड हे लक्षात आल्यानंतर इंदिरा गांधी यांनी लष्करप्रमुख अरुणकुमार वैद्या यांस सुवर्ण मंदिरात लष्करी कारवाईचा आदेश दिला. त्याबरहुकूम वैद्या यांनी ही लष्करी कारवाई केली आणि भिंद्रनवाले त्यात मारला गेला. या कारवाईचा सूड म्हणून दोघांची हत्या झाली. एक खुद्द पंतप्रधान इंदिरा गांधी. आणि दुसरे जनरल वैद्या. निवृत्तीनंतर अवघ्या सहा महिन्यांत, १९८६ साली, पुणे येथे शीख मारेकऱ्यांनी जनरल वैद्या यांस भर रस्त्यात गोळ्या घालून ठार केले. त्यामुळे इंदिरा गांधी यांच्या हत्येच्या आठवणी ताज्या झाल्या. श्रीमती गांधी यांची हत्या त्यांच्याच शीख सुरक्षा रक्षकांनी केल्याचे निष्पन्न झाल्यानंतर देशभर शिखांविरोधात संतापाचा आगडोंब उसळला. ठिकठिकाणी त्यांचे शिरकाण झाले. राजधानी दिल्लीत तर कहर झाला. रक्ताचे पाट वाहिले. जगदीश टायटलर, सज्जनकुमार आदी काँग्रेस नेत्यांनीच कार्यकर्त्यांस चिथावणी देत शिखांविरोधात हिंसाचारास प्रवृत्त केले. 'मोठा वृक्ष कोसळला की त्याखाली लहानसहान झुडपे चिरडली जातात', अशी त्यावर राजीव गांधी यांची प्रतिक्रिया. म्हणजे त्यांनी एका अर्थी शिखांच्या शिरकाणाचे समर्थनच केले. पुढे यातील काहींविरोधात न्यायालयात गुन्हे दाखल होऊन शिक्षा झाली. तथापि त्या नृशंस शीख हत्याकांडाच्या जखमा अद्यापही भरून आलेल्या नाहीत. या इतिहासाचा संबंध राहुल गांधी यांना ताज्या अमेरिका भेटीत एका शीख तरुणाने काँग्रेसच्या शीखविरोधी कृत्यांविषयी जबाबदार धरले; त्याच्याशी आहे. श्रीमती इंदिरा गांधी यांची हत्या झाली त्या वेळी राहुल गांधी १४ वर्षांचे होते आणि त्या वेळी काँग्रेसच्या राजकारणात त्यांचा काही वाटा असण्याची शक्यता नाही. पण सद्यःस्थितीत ते काँग्रेसचे अघोषित अध्यक्ष आहेत. त्यामुळे 'तेव्हा'च्या घटनांविषयी त्यांचा काहीही संबंध नव्हता हे खरे असले तरी सध्याच्या काँग्रेसशी मात्र त्यांचे थेट नाते आहे. त्यामुळे त्या पक्षाच्या इतिहासकालीन पापांसाठी त्यांना वर्तमानात काही विचारले जात असेल तर त्यात काही गैर आहे असे नाही. तेव्हा अमेरिकी तरुणाच्या कृतीबाबत काही आक्षेप घेता येणार नाही. शिखांविरोधात काँग्रेसचे धोरण, त्यातील काही वादग्रस्त नेत्यांस काँग्रेसकडून दिले गेलेले अभय इत्यादी मुद्द?यांची पार्श्वभूमी या तरुणाच्या प्रश्नास होती. त्यास सामोरे जाताना राहुल गांधी यांनी पक्षाने इतिहासात जे काही केले त्याबाबत सपशेल माफी मागितली. 'जे घडले तेव्हा मी राजकारणात नव्हतो; पण तरीही जे काही झाले ते चूक होते असेच माझे मत आहे आणि त्याची जबाबदारी घेत मी माफीही मागण्यास मागेपुढे पाहणार नाही', अशा अर्थाचे विधान राहुल गांधी यांनी केले. याआधीही '८० च्या दशकात' तत्कालीन काँग्रेस नेतृत्वाने जे काही केले त्यासाठी राहुल गांधी यांनी जनतेची क्षमा मागितलेली आहे. अमेरिकेत या माफीची पुनरुक्ती झाली. आंतरराष्ट्रीय पातळीवर इतिहासातील कृत्यांसाठी वर्तमानातील नेत्यांनी जाहीर माफी मागितल्याची अनेक उदाहरणे सापडतील. जपानने दुसऱ्या महायुद्धात युद्धकैद्यांशी क्रूर वर्तन केल्याबद्दल मागितलेली माफी, इटलीने लिबियाची मागितलेली, बेल्जियमने अफ्रिकी काँगोची, पोप फ्रान्सिस यांनी कॅनडातील स्थानिकांची, बिल क्लिंटन यांनी मोनिका लुइन्स्की हिची, टायगर वुड्स याने लैंगिक विकृतीसाठी आपल्या चाहत्यांची इत्यादी शेकडो दाखले अशा जाहीर माफीचे देता येतील. पाश्चात्त्य देश, त्यांचे नेते ऐतिहासिक चुकांसाठी वर्तमानात क्षमा मागण्यात कचरत नाहीत. याचे मूळ धर्मसंस्कारांत असावे. ख्रिाश्चन धर्मीयांचा धर्मग्रंथ बायबल हा माणूस स्खलनशील असल्याचे स्वीकारतो आणि पश्चात्तापाच्या प्रायश्चित्ताने तो पापमुक्त होऊ शकतो असेही मानतो. अर्थात बौद्ध आणि जैन या भारतात उगम पावलेल्या धर्मातही क्षमेचे महत्त्व आहेच. तेव्हा राहुल गांधी यांस शीख बांधवांची जाहीर माफी मागावी लागली या सर्वार्थाने शिळ्या कढीस राजकीय आनंदासाठी पुनःपुन्हा उकळी आणण्याचे कारण नाही. राहुल गांधी यांच्यावरील टीका रास्त ठरेल असे अनेक राजकीय प्रमाद आढळतील. असे असताना त्यांनी अमेरिकेत माफी मागितली याबद्दल भाजपच्या काही नेत्यांस आनंदाच्या उकळ्या फुटताना दिसतात. राहुल गांधी यांच्यावर देशातच नव्हे तर परदेशांतही अशी नामुष्की वारंवार येऊ लागली आहे, अशा अर्थाची प्रतिक्रिया भाजपचे नेते यावर देतात. यातून उलट आपल्याच बालबुद्धीचे प्रदर्शन होते याची या मंडळींस जाणीव दिसत नाही. माफी मागण्यात मोठेपणा असतो यावर या मंडळींचा विश्वास नसावा. अमेरिकेसारख्या देशात स्थानिक रेड इंडियन्सवर दीर्घकाळ अत्याचार होत होते. त्याकडे शासनाचे दुर्लक्ष झाले. वास्तविक त्या अत्याचारांत माजी अमेरिकी अध्यक्ष जो बायडेन यांचा काहीही हात नव्हता. तरीही सरकारच्या या औदासीन्याची जबाबदारी त्यांनी घेतली आणि स्थानिकांची माफी मागितली. क्षमा मागावी अशा कृत्यात सहभाग नसतानाही व्यापक औदार्याचे प्रदर्शन करत माफी मागितली गेल्याची आणखीही अनेक उदाहरणे सापडतील. तथापि माफी मागावी अशा कृत्यांस जबाबदार असलेले जनतेची माफी मागण्याइतका मनाचा उमदेपणा दाखवतात का, हा खरा प्रश्न. म्हणजे जमीन हस्तांतरण कायदे जाहीर करून मागे घ्यावे लागले याबद्दल, कृषी सुधारणा विधेयके मागे घ्यावी लागली याबद्दल, निश्चलनीकरणाच्या महान निर्णयामुळे जनतेचे कमालीचे हाल झाले याबद्दल, कट्टर शत्रू असलेल्या पाकिस्तानी पंतप्रधानांच्या कौटुंबिक कार्यक्रमात अकारण हजेरी लावली याबद्दल, पठाणकोट येथे प्रत्यक्ष लष्करी तळाच्या स्वयंपाकघरात अतिरेकी घुसेपर्यंत आपल्या सुरक्षा यंत्रणांस वा गुप्तहेरांस ते कळले नाही याबद्दल, चीनने गलवान खोऱ्यात घुसखोरी केल्याबद्दल, करोनाकाळात टाळ्या-थाळ्या वाजवून घेतल्या याबद्दल किंवा अगदी ताजे उदाहरण म्हणजे पहलगाम येथे सुरक्षा व्यवस्थेत दुर्लक्ष झाल्याबद्दल आपल्या कोणी मान्यवरांनी जनतेची वा संबंधितांची माफी मागितल्याचे उदाहरण नाही. याचा अर्थ या सर्व घटना माफी मागण्याएवढ्या मोठ्या, महत्त्वाच्या आहेत असे आपणास वाटत नाही असा असू शकतो. अथवा माफी मागणे हे येरागबाळ्यांचे काम; आपले नाही, अशीही धारणा यामागे असू शकते. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी गुजरात दंगलीबद्दल आणि बाबरी मशीद पाडल्यानंतर जे झाले त्याबद्दल 'खंत' व्यक्त केली होती आणि त्यांचे उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी यांचीही तीच भावना होती. हे दोन या पक्षाचे ज्येष्ठ नेते. त्यांच्यानंतर त्या पक्षाच्या कोणा नेत्याने वर उल्लेखलेल्या कृत्यांबद्दल साधी खंतही व्यक्त केल्याचे उदाहरण नाही. अलीकडच्या इतिहासात स्वतःची शिक्षा कमी केली जावी यासाठी कोणी माफी मागितली किंवा काय याची चर्चा वारंवार झडत असताना त्या पार्श्वभूमीवर आजीच्या कृत्यांसाठी नातवाने माफी मागण्याचा मोठेपणा राहुल गांधी यांनी दाखवला. मौन राहून 'चला, पुढला प्रश्न... असे म्हणण्याचा पर्याय त्यांनी नाकारला हे ठीकच. माफी आणि मौन यांतून निवड करण्याचा हा विवेक अन्यांनीही दाखवावा अशी अपेक्षा या निमित्ताने करणे अस्थानी ठरणार नाही.

बहुजनांना शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही- छ.शाहू

(छ.राजर्षी शाहू महाराज स्मृती दिन.)



राजर्षी शाहू महाराजांची विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी भेट झाली. बाबासाहेबांच्या मूकनायक या वृत्तपत्रास व पुढे त्यांच्या इंग्लंडमधील उच्चशिक्षणास त्यांनी अर्थसाहाय्य केले. माणगाव व नागपूर येथील अस्पृश्यता निवारण परिषदांत त्यांच्याबरोबर सहभागी होऊन अस्पृश्यांना त्यांचा खरा पुढारी मिळाल्याबद्दल त्यांनी त्यांचा गौरव केला. अस्पृश्यतेबरोबरच जातिभेदाशी त्यांनी अखेरपर्यंत संघर्ष केला. आंतरजातीय विवाह हा जातिभेदावर रामबाण उपाय वाटून त्यांनी आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. स्वतः पुढाकार घेऊन अनेक आंतरजातीय विवाह घडवून आणले. तसेच बालविवाहास प्रतिबंध करून नोंदणी विवाहाचा कायदा जारी केला. घटस्फोटास व विधवापुनर्विवाहास कायदेशीर मान्यता दिली. कुटुंबात होणाऱ्या शारीरिक व मानसिक छळांपासून स्त्रीला संरक्षण देणारा कायदाही त्यांनी मंजूर केला. मागासलेल्या वर्गातील मुलींना व स्त्रियांना मोफत शिक्षणाची सुविधा निर्माण केली. आपली राजकीय कारकीर्द समस्त समाजांना न्याय देण्यात खर्ची घातली होती, म्हणूनच त्यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून उत्साहाने साजरी केली जाते.



संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी. एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

सामाजिक सुधारणांबरोबरच त्यांनी शेतीस व उद्योगधंद्यांस प्रोत्साहन दिले. अनेक कृषी व औद्योगिक प्रदर्शने भरविली. पन्हाळ्यावर चहा, कॉफी, रबर यांच्या लागवडींचे प्रयोग केले. कृषी उत्पादनासाठी शाहूपुरी, जयसिंगपूर यांसारख्या बाजारपेठा वसविल्या. त्यामुळे कोल्हापूर ही गुळाची बाजारपेठ म्हणून देशात प्रसिद्ध पावली. शाहूंनी कोल्हापुरात कारखानदारीचा पाया रचला. शाहू मिलची स्थापना करून आधुनिक वस्त्रोद्योगास त्यांनी चालना दिली. शाहूंनी बांधलेले राधानगरीचे धरण कृषी क्षेत्रात संस्थानचा कायापालट करणारा उपक्रम ठरला. संस्थानी मुलखातील हे सर्वांत मोठे धरण बांधून त्यांनी आपले संस्थान सुजलाम्?-सुफलाम्? करून टाकले. त्यांनी सहकारी संस्थांचा कायदा करून सहकार चळवळीची मुहूर्तमेढ रोवली.

छत्रपती शाहू महाराज कोल्हापूर महाराष्ट्रातील करवीर तथा कोल्हापूर संस्थानचे प्रागतिक अधिपती आणि थोर समाजसुधारक होत. प्राथमिक शिक्षण, जातिभेद-निवारण, अस्पृश्यता-निवारण आदी सुधारणांचे पुरस्कर्ते होते. त्यांचा जन्म दि.२६ जून १८७४ रोजी कागलच्या जहागीरदार घाटगे घराण्यात जयसिंगराव आणि राधाबाई या दांपत्याच्या पोटी झाला. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव यशवंतराव होते. चौथ्या शिवाजींच्या अकाली निधनानंतर ते दि.१७ मार्च १८८४ रोजी कोल्हापूरच्या गादीवर दत्तक गेले. राजकोट व धारवाड येथे त्यांचे शिक्षण झाले. सर फ्रेझर व रघुनाथराव सबनीस यांसारखे गुरू त्यांना मिळाले. विद्यार्थिदशेत त्यांनी इंग्रजी, संस्कृत, इतिहास, राज्यशास्त्र इ. विषयांचा अभ्यास केला. त्यांना दि.२ एप्रिल १८९४ रोजी राज्याधिकार प्राप्त झाला. तत्पूर्वी बडोद्याच्या गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या कन्येबरोबर सन १८९१ साली त्यांचा विवाह झाला. त्यांना राजाराम व शिवाजी हे दोन मुलगे आणि राधाबाई- आक्कासाहेब व आऊबाई या दोन कन्या झाल्या. त्यांनी प्रशासन- यंत्रणेनची पुनर्रचना करून बहुजन समाजातील कर्तबगार व गुणी व्यक्तींना अधिकारावर नेमण्यास सुरुवात केली. सन १८९७-९८ साली प्रथम दुष्काळ व नंतर प्लेग अशी संकटे कोसळली.

मागासलेल्या जातींत शिक्षणाबद्दल फारशी आस्था नसल्याने व त्याचे कारण शिक्षण घेऊनही सरकारी नोकरी लाभण्याची शक्यता नसल्याने त्यांनी दि.२६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानातील ५० टक्के शासकीय नोकऱ्या मागास वर्गासाठी राखीव ठेवल्याचा जाहीरनामा काढला. राखीव जागांचे धोरण अमलात आणणारे ते भारतातील पहिले राज्यकर्ते ठरले. अस्पृश्यतेचे उच्चाटन हे आपले जीवितकर्तव्य मानले. संस्थानातील शाळा, पाणवठे, विहिरी, दवाखाने, कचेऱ्या आदी सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळण्यास त्यांनी कायद्याने प्रतिबंध केला. त्यासाठी अनेक वटहुकूम जारी केले. त्यांनी अस्पृश्यांना सरकारी नोकरीत घेतले. समाजातील तलाठ्यासारख्या प्रतिष्ठेच्या जागा दिल्या. त्यांच्यापैकी अनेकांना माहूत, हूलस्वार, पोलीस, स्वतःचे मोटारचालक म्हणून नेमले. भटक्या व विमुक्त जातींना जवळ करून त्यांचे जीवन स्थिर केले. त्यांना आपले रक्षक म्हणून नेमले. खेड्यापाड्यांतील बलुतेदारांनाही त्यांच्या बलुतेपद्धतीतून मुक्त करून त्यांना समाजातील सर्व उद्योगधंदे खुले केले. जोगिणी व देवदासी प्रथेस प्रतिबंध करणारा कायदा जारी केला.

सन १९०२ साली सातव्या एडवर्डच्या राज्यारोहणानिमित्त त्यांनी युरोपचा दौरा केला. तेथील भौतिक प्रगतीचा मोठा प्रभाव त्यांच्यावर पडला; त्यामुळे त्यांचे अनुभवविश्व समृद्ध झाले. बहुजन समाज शिकून शहाणा झाल्याशिवाय त्यांचे दारिद्र, अज्ञान व अंधश्रद्धा नष्ट होणार नाहीत, हे जाणून त्यांनी शिक्षणाच्या, विशेषतः प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारावर भर दिला. त्यानुसार त्यांनी आपल्या संस्थानात सन १९१७मध्ये सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला आणि तो अमलात आणला. प्रत्येक खेड्यात प्राथमिक शाळा सुरू केली. ते शिक्षणसम्राट महात्मा फुलेंच्या सत्यशोधक विचारसरणीकडे आकृष्ट झाले. सत्यशोधक तत्त्वांना त्यांचा पाठिंबा होता. मराठ्यांसाठी सन १९२०मध्ये स्वतंत्र क्षात्र जगद?गुरू पद निर्माण करून त्यावर सदाशिवराव पाटील या उच्चविद्याविभूषित तरुणास नेमले. त्यांनी संगीत, नाट्य, चित्रकला, मल्लविद्या आदी कलांना राजाश्रय देऊन महाराष्ट्रात कलेच्या क्षेत्रात स्पृहणीय कामगिरी केली. अनेक गायक-गायिकांनी त्यांच्या आश्रयाने भारतभर कीर्ती संपादन केली. त्यांनी अनेक नाटक कंपन्यांना व गुणी कलावंतांना आश्रय दिला. मल्लविद्येच्या प्रांतात त्यांनी संस्थानासह सर्व देशांतील मल्लांना उदार आश्रय दिला. रोमच्या आखाड्याच्या धर्तीवर कोल्हापुरात कुस्तीचे मैदान बांधले. त्यांच्या कारकीर्दीत कोल्हापूर ही मल्लविद्येची पंढरी बनली. दस्तूरखुद्द महाराज हे मल्लांचे मल्ल म्हणून प्रसिद्ध होते. पट्टीचा शिकारी म्हणून त्यांचा लौकिक होता. छ.शाहूंच्या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून कानपूर येथे कुर्मी क्षत्रिय सभेने सन १९१९ साली त्यांना राजर्षी पदवी बहाल केली. त्यांच्या कार्यामुळे दलित-पतितांचा उद्धारक, रयतेचा राजा म्हणून त्यांची प्रतिमा जनसामान्यात निर्माण झाली. या राजाने अज्ञानी बहुजन समाजाला जागृत करण्याचे व्रत अखेरपर्यंत सांभाळले.

अखेरच्या दिवसांत द्वितीय चिरंजीव शिवाजी यांच्या अपघाती निधनाने सन १९१८मध्ये ते खचून गेले, तशातच मधुमेहाने ते ग्रासले होते. अखेर मुंबई येथे दि.६ मे १९२२ रोजी त्यांचे वयाच्या अवघ्या अठ्ठेचाळीसाव्या वर्षी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यानंतर त्यांचे पुत्र राजाराम महाराज कोल्हापूरच्या गादीवर आले.

!! छ.शाहू महाराज स्मृतिदिन निमित्त त्यांना व त्यांच्या लोककल्याणकारी कार्यांना मानाचा लवून मुजरा !!

वैमात्र...

निकषलावता आता
बहिणीकाही अपात्र
भक्कम न्यासावरती
सुरक्षीत सकल पात्र

खात्यांत रकमाजमा
चकाकले चमक नेत्र
नजरलागते कुणाची
काढून घेतात रे छत्र

गैरव्यवहारकरायला
नकासोडू कुठलेक्षेत्र
घुसखोरीकरी प्रवृत्ती
बिंघडून टाकले चित्र

योजनांचा बोजवारा
कुप्त्यां चाले विचीत्र
विधीनिषेध ना काही
सद्हेतु नासवे पवित्र

मलिदाउपटू पाहणारे
भुते शितास्तव एकत्र
बदनाम करी प्रकल्प
उच्छाद मांडती सर्वत्र

कसाफसला रे प्रयोग
डागाळूं पाही सुचरित्र
ढिंढोरा पिटाया जोरा
रे शत्रूही बनतात मित्र

वंचीतांना मिळो लाभ
हो आत्मनिर्भर सगात्र
सन्मान योजनेचा हवा
वागणूक नको वैमात्र

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

माती...

पेहलगाव
भ्याडाल्ले
सुज्ञ करे सकल मति
आपल्याकबरीवरती
गर्दभा लोटली माती

पाकचरफडे अंधारा
स्वता मालवून वाती
रे बददुवा सदैव देती
निष्पाप जीव ज्योती

काय मिळवले करुन
ही पातकेआत्मघाती
पळता भुई हो थोडी
हिमालयाचे आघाती

स्वता लादू घेई गाढव
युद्ध जन्य परिस्थिती
दारिद्रयां होरपळलेला
विकलांगते मनस्थिती

एलओसीवर भारतीय
मृत्यू रुपात उपस्थिती
टिचभर किटक प्रदेश
ओढवून घेई अस्थिती

असे मोडेल कंबरडे रे
अशक्य पुन्हा उत्थिती
डिवचण्याआधि वाघा
भेकडापहा अंतस्थिती

वेठीस धरे सामान्यास
कशी ही अनवस्थिति
स्वप्नातही वाटे धास्ती
अशीकरेलं परिस्थिती

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

शासकीय कामात नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी अनेक टूल्स : कृषी आयुक्त सुरज मांढरे

वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : शासकीय कामात माहितीचे व्यवस्थापन, वेळेचे नियोजन, कामाचे निरीक्षण आणि अहवाल व्यवस्थापन करण्यासाठी नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी अनेक टूल्स उपलब्ध आहेत या टूल्सचा वापर केला तर नक्कीच शासकीय कामकाजात गतिमानता येईल, असे मत कृषी आयुक्त सुरज मांढरे यांनी व्यक्त केले.



प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्या कौशल्य विकासासाठी 'टेक वारी : महाराष्ट्र टेक लर्निंग वीक' अंतर्गत मंत्रालयात परिषद सभागृह, ६ वा मजला येथे 'तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर' या विषयावर कृषी आयुक्त सुरज मांढरे आणि महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.विकास नाईक यांचे व्याख्यान झाले. यावेळी महाराष्ट्र सदन नवी दिल्ली येथील निवासी आयुक्त आर. विमला यांसह प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

कृषी आयुक्त सुरज मांढरे म्हणाले की, गुगल कीप, एव्हरनोट, मायक्रोसॉफ्ट वन नोट, गुगल ड्राइव्ह, ड्रॉपबॉक्स, क्लिकअप, मायक्रोसॉफ्ट टू डू, गुगल कॅलेंडर, गुगल शीट्स, टेलिग्राम याचा वापर करून आपले काम अधिक गतिमान करता येईल. टेक्नॉलॉजी ही अशी गोष्ट आहे जी कोणताही भेदभाव न करता सर्वांना एका समान पातळीवर आणते. शरीर, रंग, जात, धर्म यांचा फरक न बघता ती सर्वांना उपयुक्त ठरते.

मायक्रोसॉफ्ट वन नोट या टूल्सचा जर वापर केला तर शासनाचे अनेक प्रश्न सुटतील. पेन्सिल असलेले टॅबलेट कामकाजात खूप उपयुक्त आहेत. हार्ड वर्क पेक्षा स्मार्ट वर्क वर भर दिला पाहिजे. शासनाचे काम करत असताना स्वतः देखील तंत्रज्ञान अवगत करणे अपेक्षित आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटीचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विकास नाईक यांनी सांगितले की, तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास शासकीय कामकाज अधिक परिणामकारक व वेळेत पूर्ण होऊ शकते. टास्क मॅनेजमेंटसाठी ऐनी डू (हब उद) सारख्या ॲप्लिकेशन्सचा उपयोग करून कामाची नोंद ठेवता येते व एक्सल (मिंत) चा उपयोग क्षेत्रीय स्तरावर डेटाचे व्यवस्थापन करण्यासाठी उपयुक्त ठरते.

'महाराष्ट्र सिव्हिल सर्विस' संकेतस्थळाची माहिती देताना नाईक यांनी सांगितले की, या प्लॅटफॉर्मवर नागरिक कोणत्याही विभागासंदर्भात प्रश्न विचारू शकतात व अधिकाऱ्यांकडून थेट उत्तर मिळवू शकतात.

त्याचबरोबर, 'महासंपर्क' ॲप्लिकेशनच्या माध्यमातून भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी, लोकप्रतिनिधी यांची माहिती सुलभपणे मिळू शकते, याबाबतची माहितीही त्यांनी यावेळी दिली. प्रशासकीय यंत्रणेत एखाद्या समस्येवर उपाय शोधणाऱ्या तंत्राची गरज आहे आणि यासाठी तंत्रज्ञान ही प्रभावी साधने उपलब्ध करून देते, असेही नाईक यांनी सांगितले.

महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटीच्या विविध योजनांची माहिती देत त्यांनी नाविन्यपूर्ण उपक्रम व तंत्रज्ञान यांची सांगड घालण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

डिजीटल युगात विद्यार्थ्यांची माती व संस्कृतीशी नाळ तुटू देऊ नका : शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

वृत्तसंस्था ■ सातारा

सातारा : आजच्या डिजीटल युगात विद्यार्थी हे जास्त करुन मोबाईकडे वळत आहे त्यांची आपल्या मातीशी व संस्कृतीशी नाळ तुटू देऊ नका यासाठी शिक्षकांनी गुणवत्तापूर्ण व आनंददायी शिक्षणाची व्याप्ती वाढवावी, असे आवाहन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केले.



शालेय शिक्षण मंत्री दादाजी भूसे यांनी सातारा येथील सैनिकी शाळेत शालेय शिक्षण विभागाची कोल्हापूर आढावा बैठक घेतली. बैठकीला शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, महाराष्ट्र राज्य शिक्षण, संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहूल रेखावार, कोल्हापूरचे शिक्षण उपसंचालक महेश चौथे, राजेश क्षीरसागर यांच्यासह सातारा, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी व सिंधूदूर्ग जिल्ह्यातील शिक्षक उपस्थित होते.

जे शिक्षक समर्पित, प्रतिकूल परिस्थिती विद्यार्थ्यांच्या विचार करुन उपक्रम राबवून गुणवत्तापूर्ण शिक्षण देत आहेत, अशा शिक्षकांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे, असे सांगून शालेय शिक्षण मंत्री श्री. भुसे म्हणाले, शालेय विद्यार्थ्यांसाठी शासन विविध योजना उपक्रम राबवित आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली जाते यामध्ये कोणी गंभीर आजाराचा विद्यार्थी आढळल्यास तालुका, जिल्हास्तरावर आरोग्य सुविधा द्याव्यात या सुविधा उपलब्ध नसतील तर मुंबई उपचारासाठी घेऊन यावे विद्यार्थ्याला बरा करुन घरी सोडावे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी सी.बी.सी. मधील अभ्यासक्रमाचाही राज्य शासनाने समावेश केला आहे. जिल्हा परिषदेतील शाळांमध्ये पट वाढविण्यासाठी गुढी पाडवा पट वाढवा, शाळेमध्ये देण्यात येणाऱ्या सुविधांचे फलक असे विविध उपक्रम राबवित आहेत हे उपक्रम पुढील काळातही राबवित रहा, असे मंत्री श्री. भुसे यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांची सहल शेतकऱ्यांच्या बांधावर, शासकीय कार्यालय, गॅरेज, किराणा दुकान अशा ठिकाणी घेऊन तेथे चालणाऱ्या कामकाजा विषयी सांगावे. शिक्षकांचे व संस्थाचालकांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. हे प्रश्न सोडविण्यासाठी बैठका घेतल्या आहेत हे प्रश्न टप्या टप्याने सोडविले जातील, असेही मंत्री श्री. भुसे यांनी सांगितले.

सातारा, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी व सिंधूदूर्ग जिल्ह्यातील आदर्श शाळेतील शिक्षकांनी त्यांच्या शाळेत राबविण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती संगणकीय सादरीकरणाद्वारे दिली.

महा उपासिका ममतासागर मीराताई आंबेडकर यांचा ९० वा वाढदिवस तळा या ठिकाणी मोठ्या उत्साहात साजरा; वाढदिवसाच्या अनुषंगाने तालुका शाखेच्या वतीने युवक युवतींचे एकदिवसीय धम्म प्रशिक्षण शिबिर

बोरघर ■ विश्वास गायकवाड



बोरघर / माणगांव : दि बुध्दिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्धमहासभा तालुका शाखा तळा व बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा तळा यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ०५ मे २०२५ रोजी मु.मेकडे सभागृह तालुका तळा या ठिकाणी रामदास राघो शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय बौद्धमहासभा राष्ट्रीय संरक्षक महाउपासिका मीराताई आंबेडकर यांचा ९० वा वाढदिवस साजरा करण्यात आला. त्या निमित्ताने तालुका शाखेच्या वतीने एकदिवसीय युवक-युवती धम्म प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महाउपासिका मीराताई आंबेडकर यांनी जवळपास आपल्या आयुष्याची ४५ वर्ष धम्म कार्यासाठी व्यतीत केलेली आहेत, त्यांनी संपूर्ण भारतभर भ्रमण करून बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार केला आहे. अनेक ठिकाणी बौद्ध धम्मदीक्षा कार्यक्रम घेतले आहेत, बौद्ध धम्म आत्मसात करण्या साठी त्यांनी २४ शिबिराच्या माध्यमातून धम्म उपदेश दिले आहेत. आज त्यांचे वय ९० वर्ष झाले आहे त्या अनुषंगाने त्यांना शुभेच्छा म्हणून तळा तालुक्याच्या वतीने युवक युवती धम्म प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले.

याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून केंद्रीय शिक्षक रायगड जिल्हा दक्षिण विभाग कोशाध्यक्ष चंद्रकांत गायकवाड व रायगड जिल्हा संस्कार सचिव सुभाष ओव्हाळ यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभली. या प्रशिक्षण शिबीराची सुरुवात मानव आदर्शांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली,याप्रसंगी त्रिसरण सूत्रपठण तळा तालुका भारतीय बौद्धमहासभा संस्कार उपाध्यक्ष नरेश मोरे यांनी केले, आलेल्या मान्यवरांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. या युवक युवती धम्म प्रशिक्षण शिबीरामध्ये त्रिशरण पंचशील अर्थासह व तथागत बुद्ध यांचे जीवनचरित्र या विषयावर सखोल असे मार्गदर्शन सुभाष ओव्हाळ यांनी केले. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर जीवन चरित्र व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा संदेश या विषयावर चंद्रकांत गायकवाड यांनी बहुमोल असे मार्गदर्शन केले. याप्रसंगी तालुका शाखेच्या वतीने आदरणीय मिराताई आंबेडकर यांच्या वाढदिवसा निमित्त जिल्हा पदाधिकारी,तालुका शाखा पदाधिकारी व शिबिरार्थी यांच्या वतीने केक कापून आनंद व्यक्त करण्यात आला.

सदर शिबिरासाठी भारतीय बौद्धमहासभा रायगड जिल्हा दक्षिण विभाग अध्यक्ष संतोष जाधव, रायगड जिल्हा संघटक सूर्यकांत तांबे यांनी सदिच्छापर भेट दिली, या प्रसंगी तळा तालुका भारतीय बौद्धमहासभा महिला अध्यक्षा सुषमा शिंदे, महिला संरक्षण सचिव वैशाली नाक्ते, बौद्धजन पंचायत समिती बौद्धाचार्य अनेश येलवे आदी मान्यवरांनी शिबिरार्थींना शुभेच्छा दिल्या, तदनंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष रामदास शिंदे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले, या कार्यक्रमाच्या निमित्ताने गणपत जगताप, हरिशचंद्र शिंदे, सुमन सकपाळ, बौद्धजन पंचायत समिती कोषाध्यक्ष पांडुरंग गवाणे, नाना जगताप,जेके गायकवाड, युवराज जाधव, रवींद्र जगताप, सविता शिंदे व समता सैनिक दलाचे जवान शिशुपाल गवाणे, प्रथमेश शिंदे आदि मान्यवर उपस्थित होते, या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सुरेंद्र शेलार यांनी केले व आभार प्रदर्शन नरेश मोरे यांनी केले, याप्रसंगी सरणत्तय झाल्यानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

सेलू तालुक्यात वादळी वाऱ्यामुळे सौर पंपाचे नुकसान



सेलू ■ वसंत आवटे

सेलू तालुक्यामध्ये गेल्या दोन दिवसापासून वादळी वाऱ्यासह वातावरणात बदल होण्याचे सत्र चालू आहे. यामुळे म्हाळसापुर शिवारामध्ये सौर पंपाचे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे. ५ मे रोजी दुपारी ४ वाजता अचानक वातावरणात बदल होऊन वादळ वारे मोठ्या प्रमाणात सुटले होते. या वादळी वाऱ्यामुळे म्हाळसापुर येथील महिला शेतकरी गोदावरी आप्पाराव आवटे यांनी शेत गट क्रमांक ७३ मध्ये पिकाला पाणी देण्यासाठी सौर पंप बसवला होता. अचानक आलेल्या जोरदार वादळी वाऱ्यामुळे सौर पंपाची एक पाटी फुटली आहे. त्यामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले असून तालुक्यात अचानक आलेल्या अस्मानी संकटामुळे शेतकऱ्यापुढे नवे आव्हान उभे टाकले आहे.

मांदळेवाडीमधे जय हनुमान यात्रा उत्सव उत्साहात संपन्न

मांदळेवाडी ■ कैलास गायकवाड



मांदळेवाडी ता. आंबेगाव जि. पुणे मध्ये जय हनुमान यात्रा उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सदर उत्सवामध्ये बैलगाडा शर्यत व मनोरंजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक २ मे व ३ मे रोजी भव्य बैलगाडा शर्यती संपन्न झाल्या. दिनांक ३ मे रोजी रात्री नृत्यांगना सायली पाटील यांचा मनोरंजनाचा कार्यक्रम तर ४ मे रोजी भिका भीमा सांगवीकर यांचा लोकनाट्य तमाशा चा कार्यक्रम संपन्न झाला. दोन दिवस आयोजित केलेल्या भव्य बैलगाडा शर्यतीमध्ये एकूण ३२५ बैलगाडे धावले त्यामध्ये दोन दिवसात सर्वात आतून आलेली बारी कै. फक्कडराव मार्तंडराव शिंदे, कान्हूर मेसाई यांच्या बैलगाड्याने घाटाचा महाराजा होण्याचा मान मिळवत दुचाकी पटकावली तर दुर्योधनदादा दगडू शिंगाडे , शिंगाडवाडी यांच्या गाड्याला घाटाचा राजा हा बहुमान मिळाला.प्रथम क्रमांकात एकूण ४३ गाडे आले तर प्रथम क्रमांक फळीफोड पहिला दिवस विलास वसंत नाणेकर हे ठरले तर दुसरा दिवस संतोष मधुकर गावडे हे ठरले. द्वितीय क्रमांक एकूण १०५ गाडे आले तर द्वितीय क्रमांक फळीफोड पहिला दिवस देवांश गणेश जाधव तर दुसरा दिवस सदाशिव महादू पानसरे हे ठरले. तृतीय क्रमांकात एकूण ७७ गाडे आले तर तृतीय क्रमांक फळीफोड पहिला दिवस शहाजी सुदाम काशीद तर दुसरा दिवस बाळासाहेब नानाभाऊ खैरे हे ठरले. चतुर्थ एकूण ३८ गाडे आले तर चतुर्थ क्रमांक फळीफोड पहिला दिवस कै. गुलाबराव बाळाजी पुंडे तर दुसरा दिवस शौर्य कुमार स्वप्निल गावडे हे ठरले. सदर यात्रा उत्सव यशस्वी करण्यासाठी जय हनुमान यात्रा उत्सव कमेटी व समस्त ग्रामस्थ मांदळेवाडी पुणेकर, मुंबईकर मंडळी यांनी अपार मेहनत घेतल्याचे अध्यक्ष विजय आदक व विकास आदक यांनी सांगितले.

एनडीआरएफ (ऊँइ) च्या टीम कडून बोरीव येथे देण्यात आले आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण; एक मुख्य टीम अधिकाऱ्यांसह ०९ जवानांचा समावेश

वाई ■ प्रशांत थोरवे



वाई : वाई. ०५ बटालियन एनडीआरएफ (ऊँइ) टीम पुणे यांच्याकडून वाई तालुक्यातील बोरीव येथे आपत्ती निवारण / व्यवस्थापन प्रशिक्षण देण्यात आले.मंगळवार दिनांक ०६ जुलै रोजी बोरीव येथील धोम धरण जलशयाच्या किनारी ऊँइ च्या प्रमुख अधिकारी धर्मेंद्र सेवदा व त्यांच्या टीमने आपत्ती निवारणा विषयी उपस्थित सर्वाना मार्गदर्शन केले. तसेच उपस्थित ऊँइच्या जवानांच्या मदतीने कोणत्याही प्रकारची आपत्ती आल्यावर त्याला कसे तोंड द्यावे अर्थात त्या आपत्ती तुन सुखरूप बाहेर कसे पडता येईल या बाबतचे प्रात्यक्षिके करून दाखवण्यात आली.

कोणत्याही नैसर्गिक आपत्तीच्या वेळी स्थानिक नागरिकांनाच प्रथम सामारे जावे लागते. अशावेळी स्थानिक नागरिकांना योग्य प्रशिक्षण देऊन संभाव्य जीवितहानी टाळण्यासाठी हे आपत्ती निवारण प्रशिक्षण हे अत्यंत मोलाचे आहे. त्यासाठी राष्ट्रीय आपत्ती निवारण दलातर्फे प्रशिक्षण व प्रात्यक्षिक शिबिरांच्या माध्यमातून जागृती करण्यात येत असल्याची माहिती देण्यात आली.

एखादी आपत्ती किंवा दुर्घटनेची माहिती एनडीआरएफसारख्या विशेष दलांना मिळून ते त्या ठिकाणी पोहोचेपर्यंत बराच वेळ जातो. या काळात दुर्घटनाग्रस्त व्यक्तींना स्थानिक नागरिकच तातडीची मदत करू शकतात. यासाठी हे आपत्ती निवारण प्रशिक्षण महत्वाचे ठरते.यामध्ये पुरात अडकलेल्या व्यक्तींना कसे बाहेर काढता या विषयी विस्तृत मार्गदर्शन करण्यात आले.

एनडीआरएफ'च्या पथकाने महापुराच्या कालावधीत करावयाच्या रेस्क्यू पद्धती, बोटीतून करायचे 'रेस्क्यू ऑपरेशन' ची माहिती व प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. पुराच्या वेळी आवश्यक असलेली बचाव कार्याची प्रत्यक्षिके करून दाखवली . लोकांना आपत्ती च्या वेळीकसे सुखरूप पणे बाहेर पडायचे याचे मार्गदर्शन करण्यात आले.

टीम ऊँइ मध्ये धर्मेंद्र सेवदा व त्यांच्या ०९ जवानांच्या टीमने बोरीव मध्ये येऊन धोम धरण जलाशयाच्या किनारी आपत्ती निवारणासाठी केलेल्या मार्गदर्शन व प्रात्यक्षिकांमुळे सर्वांनीच समाधान व्यक्त केले. सातारा जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये या एनडीआरएफ च्या टीम मार्फत १५ मे पर्यंत आपत्ती निवारण प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

या प्रशिक्षण वेळी वाई तालुक्याच्या तहसीलदार सोनाली मेटकरी , विश्वनाथ कांबळे मंडल अधिकारी पसरणी, ग्राम महसूल अधिकारी प्रकाश कांबळे, संतोष जगताप, माधवी वीर, संजय जाधव, राहुल कचरे, व्याहाळी कॉलनी (बोरीव) गावच्या सरपंच सुजाता कांबळे तसेच विविध गावचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, आशा सेविका, शिवसह्याद्री रेस्क्यू टीम वाईचे राजेंद्र खरात सर व त्यांची संपूर्ण टीम तसेच मोठ्या संख्येने व्याहळी कॉलनी (बोरीव)गावचे ग्रामस्थ उपस्थित होते.

श्री गुरु बुद्धी स्वामी महाविद्यालयाच्या वाणिज्य शाखेचा १०० टक्के निकाल

परभणी ■ अरविंद कांबळे

परभणी : पूर्णा . येथील श्री गुरू बुद्धिस्वामी महाविद्यालयातील बारावीच्या निकालाची यशस्वी परंपरा या वर्षीही कायम राहिली आहे. कला ,वाणिज्य ,व्यावसायिक अभ्यासक्रम व विज्ञान शाखेतील यशस्वी विद्यार्थ्यांची गुणवत्ता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये कायम ठेवली आहे सर्वच विभागातील निकाल उत्कृष्ट लागला आहे

महाविद्यालयातील एकुण निकाल ८५.०५ टक्के लागला आहे. कला शाखेतील कऱ्हाळे नवीनकुमार भगवान या विद्यार्थ्याने ८३.६७ इ गुण घेऊन प्रथम क्रमांक मिळवला आहे, तर भक्ती मुंजाजी मुळे या विद्यार्थिनी ८१.१७इ गुण घेऊन द्वितीय क्रमांक प्राप्त केला , तर वाणिज्य शाखेचा निकाल १००इ लागला आहे .वाणिज्य शाखेत कु बुचाले गायत्री रमेश या विद्यार्थिनी ९१.६७ गुण घेऊन प्रथम आली आहे तर कु ढोणे संध्या माधव या विद्यार्थिनीनी ८१.३३ गुण घेऊन द्वितीय क्रमांक मिळवला आहे.

तर विज्ञान शाखेतील महाजन वोमीत अरविंद या विद्यार्थ्याने ८१इटक्के गुण घेतले असून झिनत अतिक खान पठाण या विद्यार्थिनींनी याने ७६.३३इ घेऊन द्वितीय क्रमांक मिळवला आहे तर व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये शेख इरफान अजीज या विद्यार्थ्याने ८२.१७ गुण घेऊन प्रथम क्रमांक मिळवला आहे.तर बोकारे श्रुती रघुनाथ हिने ७०.३३ गुण घेऊन द्वितीय क्रमांक प्राप्त केला

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले असून त्याच्या या नेत्र दीपक कामगिरीबद्दल श्री गुरु बुद्धीस्वामी शिक्षण प्रसारक संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री नंदिकेश्वर शिवाचार्य महास्वामीजी ,कार्याध्यक्ष प्रमोद अण्णा एकलारे, सचिव अमृतराज कदम, कोषाध्यक्ष उत्तमराव कदम ,सहसचिव प्रा. गोविंदराव कदम, प्राचार्य डॉ के राजकुमार, उपप्राचार्य डॉ शिवसांब कापसे, उपप्राचार्य डॉ गजानन कुरुंदकर, पर्यवेक्षक श्री मिटकरी यु पी, उपप्राचार्य खराटे व सर्व प्राध्यापकांनी त्याचे अभिनंदन केले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ४ महिन्यांत होणार? सुप्रीम कोर्टाचा मोठा निर्णय! चार आठवड्यात नोटिफिकेशन काढण्याचे आदेश, राज्य सरकारच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष

पुणे ■ इसरार शेख



पुणे : अनेक वर्षांपासून रेंगाळलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. सुप्रीम कोर्टाने आज याबाबत महत्वाचा आदेश देत पुढील चार महिन्यांत निवडणूका घेण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाला दिले आहेत.त्यासाठी पुढील चार आठवड्यांत याबाबतच नोटिफिकेशन काढण्याचे आदेशही कोर्टाने दिले आहेत.

कोर्टाच्या आदेशामध्य सर्वात महत्वाचा मुद्दा ओबीसी आरक्षणाबाबत आहे. ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यामुळे या निवडणुका रखडल्या होत्या. आता कोर्टाने ओबीसी आरक्षणाची २०२२ पूर्वीची असलेली स्थिती कायम ठेवत निवडणुका घेण्याचा महत्वपूर्ण आदेश दिला आहे. २०२२ मध्ये ओबीसी आरक्षणाबाबत जी परिस्थिती असेल, तीच राहील, असे सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले आहे.

याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी सांगितले की, महाराष्ट्रात आज पाच वर्षांहून अधिक प्रशासक कार्यरत आहे. राज्यघटनेच्या तरतुदीच्या हे विपरीत आहे. सुप्रीम कोर्टाने असेही सांगितले की, अनियमितता आढळून आल्या आहेत. त्यामुळे लोकनियुक्त प्रतिनिधी असायला हवे. कोर्टाने निवडणुका घेण्यास कुणाचा विरोध आहे का, असे विचारल्यानंतर कोर्टाने निवडणूक घेण्याचे आदेश दिले.

चार आठवड्यांत नोटिफिकेशन काढून चार महिन्यांत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश कोर्टाने दिले आहेत. यामध्ये आता २०२२ पूर्वी ओबीसी आरक्षणाबाबत जी स्थिती होती, तशीच राहील. त्यानुसार पूर्वी जेवढ्या जागा होत्या, तेवढ्याच जागा कायम राहणार आहेत. ज्याठिकाणी निवडणुका घेणे शक्य होणार नाही, त्याबाबत अडचण असल्यास सुप्रीम कोर्टात अर्ज करून निवडणूक आयोगाला वेळ वाढवून घेता येऊ शकतो, असेही वकिलांनी सांगितले.

निवडणुका घेण्यास आक्षेप नसल्याचे यावेळी राज्य सरकारकडून स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यानच्या काळात सुप्रीम कोर्टात ओबीसी आरक्षणावरून सुनावणी सुरूच राहणार आहे. याबाबतचा अंतिम निकाल आल्यानंतर सुप्रीम कोर्टाचा आदेश सर्वांना मान्य करावा लागणार असल्याचेही वकिलांनी सांगितले.

श्री संत सद्गुरु माहुजी महाराज प्रेरीत आडगाव वाणेगाव निभोरी बनोटी या चारही शाखाचे मठाधिपती म्हणून श्री ह भ प विठ्ठल महाराज यांची नियुक्ती

दै, जनप्रभात सोयगाव प्रतिनिधी ■ भावराव मोरे



सोयगाव : संत श्री माहुजी महाराज परंपरेचे उत्तराधिकारी हभप विठ्ठल महाराज यांचे पदग्रहण आणि विद्यमान गादीपती हभप भानुदासजी म.यांचे अभीष्टचिंतनाचा खूपच सुंदर कार्यक्रम झाला श्रीगुरु मोठेबाबा वारकरी सेवा ट्रस्टचे अध्यक्ष हभप गजाननजी म. यांचे सुश्राव्य कीर्तन आधी झाले.ट्रस्ट सदस्यांपैकी ,शाम म.शास्त्री (तीनही दिवस कीर्तन एडजस्ट करुन अथवा रद्द करुन उपस्थिती दिली, महंत प्रा.डॉ.सुशील महाराज (मंदिर कलशारोहण करुन वेळात वेळ काढून आले),हभप गोविंद म. वरसाडेकर, हभप पांडुरंग अण्णा आवारकर,हभप प्रा.चत्रभूज पाटील,हभप ज्ञानेश्वर आबा पाळधीकर जातीने हजर होते. या व्यतिरिक्त सदुरु जोग म.वारकरी शिक्षण संस्था आळंदीचे सचिव हभप चंदिले नाना, हभप गजाननजी पवार, सुरेश म.सार्वेकर,राजेंद्र महाराज कासोदेकर,कैलास म. वनकोठेकर, चिंतामण आबा,अशोक म. आडगावकर, यांचेसह जिल्ह्यातील व बाहेरील शेकडो कीर्तनकार या हृद्य सोहळ्याचे साक्षीदार होते.राजकीय क्षेत्रातील ना.गुलाबभाऊ पाटील, माजी आ.महेंद्र बापू पाटील, शिवसेना नेत्या महानंदा पाटील,आ.अनिल पाटील यांच्या धर्मपत्नी जयश्रीताई पाटील, राजश्रीताई पाटील,आणि एरंडोल तालुक्यातील अग्रगण्य राजकीय नेते उपस्थित होते. संत माहूजी म.प्रणित

निंभोरी,वाणेगाव,बनोटी येथून सर्व शाखांचे चेअरमन,ट्रस्टी आणि परंपरेवर प्रेम करणारे शेकडो नागरिक आवर्जून उपस्थित राहिले. मंत्रोच्चारांच्या गजरात विद्यमान गादीपती हभप भानुदासजी म.यांचे अभीष्टचिंतन, पाद्यपूजन, तसेच उत्तराधिकारीपदी विराजमान होणारे हभप विठ्ठल महाराज यांना परंपरेची माळ, पागोटी देऊन सूत्रे हाती दिली गेली.त्यानंतर त्यांचे पाद्यपूजन आणि अभीष्टचिंतन मंत्रोच्चारात करण्यात आले. हभप चंदिले नाना, हभप गजाननजी पवार, बनोटी संस्थानचे चेअरमन, माजी आमदार महेंद्रबापू पाटील, हभप गजानन

म.वरसाडेकर,महानंदाताई पाटील, जयश्री ताई पाटील यांनी समयोचित मनोगते व्यक्त करुन नूतन उत्तराधिकारी विठ्ठल म.यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या. मा.ना.गुलाबाभाऊ यांनी अध्यक्षीय भाषण करुन हभप विठ्ठल म.यांना दक्षिणा अर्पण करुन शुभेच्छा दिल्या. कीर्तनानंतर सुमारे दोनतास चाललेल्या या सुनियोजित कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हभप प्रल्हाद पाटील. यांनी केले. या ऐतिहासिक सोहळ्यासाठी हजारो भाविकांचा समुदाय रणरणत्या उन्हात उपस्थित होता.महिला भगिनी हजारोंच्या संख्येने पूर्णवेळ उपस्थित होत्या. कार्यक्रमानंतर हभप भानुदास महाराज आणि हभप विठ्ठल महाराज यांच्या दर्शनासाठी तुडुंब जनसागर उसळला होता. न भूतो न भविष्यति अशा या सोहळ्यास पत्रकार,मीडिया प्रतिनिधी ,परंपराप्रेमी सर्व भाविक भक्तांसाठी प्रसाद भोजनाचे आयोजन करण्यात आले होते.पंचक्रोशीतील सर्व ग्रामस्थांना महाप्रसादाचे खुले निमंत्रण दिले होते. कार्यक्रमाचे शेवटी परंपरेच्या वतीने आडगाव चेअरमन हभप बापू पाटील यांनी आभार प्रदर्शन केले.

आता राज्यात स्वतंत्र आर्थिक गुप्तचर विभाग आर्थिक गुन्हेगारी व बँक घोटाळ्याचा होणार पर्दाफाश

परभणी ■ दत्तात्रय कराळे



परभणी : राज्यात दिवसेंदिवस खासगी स्वरुपाचे आर्थिक घोटाळे आणि बँक घोटाळे अधिकच वाढीस लागले आहेत. त्यामुळे जनतेची घोर फसवणूक होत असल्याचे ध्यानी घेऊन त्याला आळा घातला यावा त्याशिवाय गुन्हेगार आणि गुन्हेगारीचे उच्चाटन करणे शक्य व्हावे, यासाठी केंद्र सरकार प्रमाणेच राज्य सरकारही आर्थिक गुप्तचर विभाग स्थापन करणार आहे. बँक घोटाळ्याचा पर्दाफाश करुन गुन्हेगारी नेटवर्क आणि आर्थिक फसवणूक रोखण्याची जबाबदारी त्या विभागावर सोपवली जाणार आहे.

मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या मार्गदर्शनाखाली व गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या पुढाकाराने हे युनिट तयार करण्यात आले आहे. राज्यासह देशातही मोठ्या प्रमाणात सायबर गुन्हे वाढीस लागले आहेत. त्यामुळे हा विशेष विभाग स्थापन करण्यात आला आहे. मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेअंतर्गत आर्थिक गुप्तचर युनिटचे नेतृत्व वरिष्ठ पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याकडे सोपवले जाणार आहे. त्याशिवाय दोन सहाय्यक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक आणि आठ पोलीस कर्मचारी दिमतीला सहकारी म्हणून त्यांना दिले जाणार आहेत.

इकॉनॉमिक इंटेलिजन्स युनिटद्वारा नागरिकांच्या रोजच्या जीवनात दिसून न येणारी परंतु अत्यंत महत्त्वाचे असे आर्थिक सुरक्षा कवच पुरवण्यातही हे युनिट काम करणार आहे. त्यामुळे आर्थिक साखळीमधील ही वाढती गुन्हेगारी उध्वस्त करण्यास बऱ्यापैकी मदत होऊ शकेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. शासनाचे हे प्रयत्न सत्कारणी लागले जातील व भविष्यात ते लोकाभिमुख ठरले जातील, ज्यामुळे गुन्हेगारांच्या मुसक्या आवळणे शक्य होईल.

दारूचा अतिरेक, आरोग्याच्या दृष्टीने फायदे की तोटे? जाणून घ्या दोन्ही बाजू

वाघोली (पुणे) ■ स्वरुप गिरमकर



(पुणे) वाघोली : दारूचे सेवन हा एक चर्चेचा विषय असतो. काही लोक त्याच्या नम्र प्रमाणात सेवनासारखा, आरोग्यासाठी फायदेशीर मानतात, तर काही लोक त्याच्या अतिरेकाच्या परिणामामुळे आरोग्यावर होणारा नकारात्मक प्रभाव दर्शवतात. दारूचे सेवन मध्यम प्रमाणात केल्यास त्याच्या काही फायदेशीर परिणामांचा अनुभव घेतला जातो, तर अतिरेक झाल्यास त्याचे परिणाम घातक ठरू शकतात. चला तर, जाणून घेऊया दारूच्या सेवनाचे फायदे आणि तोटे.

१. दारूचे अतिरेकाचे शारीरिक तोटे

शारीरिक आरोग्यावर दारूचा अतिरेक तात्काळ आणि दीर्घकालिक नकारात्मक परिणाम करतो.

दारूच्या अधिक सेवनामुळे शरीराच्या विविध अवयवांवर ताण पडतो. यामध्ये लिव्हरचे नुकसान, हृदयविकार, पचनसंस्थेच्या समस्या, आणि किडनीचे नुकसान यांचा समावेश होतो. दीर्घकाळ दारू पिणे लिव्हर सिरोसिस, हृदयरोग आणि इतर गंभीर कर्करोगच्या धोका वाढवू शकतो.

सल्लाः 'दारूचा अतिरेक लिव्हर आणि हृदयाच्या समस्यांना कारणीभूत ठरू शकतो. त्यामुळे प्रत्येकाने आपला सेवनाचा प्रमाण ठरवूनच दारूचे सेवन करावे.'

२. मानसिक आरोग्यावर परिणाम

दारूच्या अधिक सेवनामुळे केवळ शारीरिक आरोग्यावरच परिणाम होत नाही, तर मानसिक आरोग्यावर देखील गंभीर परिणाम होऊ शकतात. दारूचे अति सेवन उदासीनता, चिंता, नकारात्मक विचार, आणि मनोरुग्णता वाढवू शकते. हे मानसिक शुद्धतेवर बिघाड आणते आणि व्यक्तीच्या भावनिक संतुलनावर परिणाम करतो.

सल्लाः 'दारूचे अति सेवन मानसिक स्वास्थ्यावर विपरीत परिणाम करते, ज्यामुळे दीर्घकालिक मानसिक समस्यांचा सामना करावा लागू शकतो.'

३. सजीव जीवनशैलीवर परिणाम

दारूचा अतिरेक केल्यास प्रजनन क्षमता आणि लैंगिक कार्यक्षमता प्रभावित होऊ शकते. महिलांमध्ये हार्मोनल असंतुलन आणि पुरुषांमध्ये शुक्राणूंच्या गुणवत्तेवर परिणाम होऊ शकतो. तसेच, दारूचे सेवन स्मरणशक्ती आणि निर्णयक्षमता कमी करते, ज्यामुळे व्यक्तीचे काळजी घेणे आणि सकारात्मक जीवनशैली ठेवणे कठीण होते.

सल्लाः 'दारूचे अति सेवन शारीरिक तसेच मानसिक कार्यक्षमतेवर नकारात्मक परिणाम करतो, आणि तुमच्या जीवनशैलीत अनेक अडचणी आणू शकते.'

४. दारूचे सेवन आणि फायदेः मर्यादित प्रमाणात

दुसरीकडे, मर्यादित प्रमाणात दारूचे सेवन आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकते. काही अभ्यासानुसार, रेड वाईनमध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स आणि पॉलिफिनोल्स हृदयाच्या आरोग्यासाठी लाभकारी असतात. यामुळे हृदयरोगाच्या धोका कमी होतो. तसेच, दारूचे कमी प्रमाणात सेवन सामाजिक संबंध सुधारण्यासाठी आणि भावनिक ताण कमी करण्यासाठी देखील उपयुक्त ठरू शकते.

सल्लाः 'मध्यम प्रमाणात दारूचे सेवन हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकते, परंतु प्रमाण आणि काळजी आवश्यक आहे.'

तज्ज्ञांचे मतः'दारूचे अति सेवन केल्यास शारीरिक तसेच मानसिक स्वास्थ्यावर विपरीत परिणाम होतो. मात्र, मर्यादित प्रमाणात सेवन केल्यास काही प्रमाणात फायदे होऊ शकतात, परंतु कोणत्याही परिस्थितीत प्रमाणाचे पालन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.'

- डॉ. दाफिया चिंचणीकर, वाघोली, पुणे.

पवार महाविद्यालयातील बारावीच्या निकालाची यशाची परंपरा कायम

परभणी ■ अरविंद कांबळे



परभणी : पूर्णा . येथील स्वातंत्र्य सैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालयातील बारावीच्या निकालाची यशस्वी परंपरा या वर्षीही कायम राहिली आहे. कला व विज्ञान शाखेतील यशस्वी विद्यार्थ्यांची गुणवत्ता पाहता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये कला शाखेचा ६६.६६ इनिकाल लागला असून विज्ञान शाखेतील ९५.२३ इ निकाल लागला आहे.

महाविद्यालयातील एकुण निकाल ७७.१९ टक्के लागला आहे. कला शाखेतील नंदिनी गणेश साखरे या विद्यार्थिनीने ७२.८३ इ गुण घेतले आहेत तर दिव्या भागवत शिंदे या विद्यार्थिनी ७२.१७ इ गुण, अविनाश कोंडीबा वरकड या विद्यार्थ्याने ६९.३३इ गुण घेतले आहेत .

तर विज्ञान शाखेतील अभियोग गंगाधर नरवाडे या विद्यार्थ्याने ७७ इ टक्के गुण घेतले असून वैभव रामचंद्र वैद्य याने ७२.८३ इतर शेजल गोविंद खोंडे या विद्यार्थीनीने ७२.१७ गुण घेतले आहेत.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले असून महाविद्यालयाचे संस्थापक सचिव तथा प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार, अध्यक्ष, गुलाबराव कदम, कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रा. सुजाता घन, प्रा.अलका दुधगोंडे, महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

वीज पडून ठार झालेल्या ढोरवाडी येथील अभिमन्यू नलभे या धनगर समाजातील तरुणाच्या चिमुकल्या लेकरांच्या मदतीसाठी दानशूर व्यक्तींनी पुढे यावेत ; बी एम पवार

तेलगाव ■ सोमेश्वर सोनटक्के

तेलगाव : वडवणी तालुक्यातील ढोरवाडी येथील शेत मजूर अभिमन्यू नलभे या धनगर समाज बांधवाचे काल अंगावर वीज पडून निधन झाले आहे या तरुणाला चार मुली आणि एक मुलगा असुन नलभे कुटुंब उघड्यावर पडले असुन या कुटुंबाला आर्थिक मदतीची गरज असुन एक हात मदतीचा म्हणून सर्व दानशूर व्यक्ती पुढे यावेत असे आवाहन ओबीसी नेते तथा सेवालाल सेना संस्थापक/ अध्यक्ष बी एम पवार यांनी केले आहे.

या संदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात असे म्हटले आहे की, काल बीड जिल्ह्यात आणि विशेषतः वडवणी तालुक्यात अवकाळी पाऊस झाला होता. वडवणी तालुक्यातील ढोरवाडी येथील अभिमन्यू नलभे हा कामगार तरुण कामावरून घरी परत येत असताना त्यांच्या अंगावर वीज पडल्याने ते जागीच ठार झाले आहेत.

अभिमन्यू नलभे हा तरुण ऊसतोडणी आणि शेतातील मजूरीचे काम करीत होता त्यांच्या अचानक निधनामुळे नलभे कुटुंब उघड्यावर पडले आहेत. अभिमन्यू नलभे या तरुणाला चार मुली व एक मुलगा असुन आर्थिक परिस्थिती अतिशय बिकट आहे त्यामुळे उघड्यावर पडलेल्या नलभे कुटुंबाला आता आर्थिक मदतीची खरी गरज आहे.

शासनाच्या मदतीची अपेक्षा न बाळगता आपण समाजाचे देणेकरी आहोत अशी भावना मनात बाळगावी . एक हात मदतीचा हे अभियान सुरू करण्यात आले असून या अभियानात आपण सर्वांनी सहभागी व्हावे आणि मदतीचा हात पुढे करावा असे आवाहन बी एम पवार यांनी केले आहे.

छत्रपती राजर्षी शाहू महाराज उच्च माध्यमिक विद्यालयाची बारावी परीक्षेत निकालाची परंपरा कायम

बीड ■ प्रतिनिधी

बीड वडवणी : वडवणी येथील छत्रपती राजर्षी शाहू महाराज माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाने बारावीच्या परीक्षेत निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा २०२५ बारावीचा निकाल दिनांक पाच मे रोजी ऑनलाईन पद्धतीने जाहीर झाला असून त्यामध्ये विज्ञान शाखेचा निकाल १००इ टक्के लागला असून त्यात सर्वप्रथम चि. विकास सानप ८१.५०इ घेऊन विज्ञान शाखेतून प्रथम आला. तसेच कु. शितल केंदळे ८१.३३ इ घेऊन द्वितीय क्रमांक व कु. चव्हाण प्रतीक्षा ७९.१७इ गुण घेऊन तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

तसेच कला शाखेचा निकाल ८८.४६ इ लागला असून त्यामध्ये प्रथम क्रमांकाने चि. जाधव निखिल ७५.३३इ घेऊन उत्तीर्ण झाला तसेच द्वितीय क्रमांकाने कु. लंबाटे अश्विनी ७१.५०इ घेऊन उत्तीर्ण झाली तसेच तृतीय क्रमांकाने कु. कांबळे आरती व हुमेरा सय्यद ७०.५०इ घेऊन तृतीय क्रमांकाने उच्च माध्यमिक विद्यालयातून प्रथम आल्या तसेच या परीक्षेत महाविद्यालयातील अनेक विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रा. श्री सर्जेराव काळे सर तसेच युवा नेते एडवोकेट श्री. आनंद भैय्या काळे व प्राचार्य श्री बाळासाहेब सानप श्री. सचिन सलगर व सर्व शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

स्व. वत्सलाबाई गोहाड कनिष्ठ महाविद्यालयाची उत्कृष्ट यशाची परंपरा कायम



तळेगाव ■ प्रतिनिधी

तळेगाव शा. पं. येथील स्व. वत्सलाबाई गोहाड कनिष्ठ महाविद्यालयाने दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा १२वी च्या शालान्त परिक्षा २०२५ मध्ये सुद्धा आष्टी तालुक्यातुन उत्कृष्ट यशाची परंपरा कायम ठेवली. महाविद्यालयाचा एकुण निकाल ९६.३६? लागला. यामध्ये कला विभाग ९६.९३? वाणिज्य विभाग १००इ व्यावसायिक अभ्यासक्रम ८७.५०? निकाल लागला. तर गुणानुक्रमे परिक्षा केंद्रावरून प्रथम वाणिज्य विभागातील कु. रुश्विनी हळदे ७१.१७? तर द्वितीय कला विभाग कु. प्रणाली टिके. ७०.६७? तृतीय वाणिज्य विभाग कु. प्रज्ञा काळे ७०.५०? गुण मिळविले आहे.

तर कला विभागातून द्वितीय कु. धनश्री वलके ७०.००? तृतीय कु. कृतिका घंघाळ वाणिज्य विभागा तृतीय कु. कांचन काळे ७०.३३? व्यावसायिक अभ्यासक्रम विभागात प्रथम कु. वैशाली सोनारे ६६.१७? द्वितीय कु. प्रिती मेश्राम ६५.५०इ तृतीय सौरभ मुने ६३.००? गुण प्राप्त केले आहे. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अप्पर वर्धा प्रकल्प ग्रस्त वेल्फेअर सोसायटी चे अध्यक्ष मा. अनिलरावजी गोहाड, सचिव मा. सुभाषरावजी पावडे उपाध्यक्ष मा. मनोहरराव पावडे प्राचार्य चंद्रकांत ताथोडे व सर्व प्राध्यापक आणि कर्मचारी वर्ग यांनी अभिनंदन व कौतुक केले. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय महाविद्यालयातील प्राध्यापक व आपल्या आई वडिलांना दिले.

कंधारमध्ये कृषी विभागाचे खरीप हंगाम पूर्व प्रशिक्षण संपन्न

कंधार ■ संतोष कांबळे



कंधार : तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कंधारच्या वतीने खरीप हंगाम पूर्व प्रशिक्षण (२०२५-२०२६) मंगळवारी, ६ मे रोजी सकाळी ११ वाजता सभागृह, तहसिल कार्यालयात आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणास अनेक मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

खरीप हंगाम पूर्व प्रशिक्षणाच्या अध्यक्षस्थानी कंधारचे तालुका कृषी अधिकारी भरत वाठोरे हे होते. या प्रशिक्षणास राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त तथा प्रगतशील शेतकरी रत्नाकर ढगे पाटील, प्रगतशील शेतकरी कृष्णा भालेराव, कंधारचे मंडळ कृषी अधिकारी गोदाती काळे, बारूळचे मंडळ कृषी अधिकारी सुनील राठोड, कृषी अधिकारी कु. स्वाती टेळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा हरित क्रांतीचे प्रणेत कै. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या प्रशिक्षणाचे प्रस्ताविक तालुका कृषी अधिकारी भरत वाठोरे यांनी करुन खरीप हंगामात करावयाच्या नियोजनाबद्दल जसे गावबैठकाद्वारे, बीजप्रक्रिया मोहीम, बीज उगवण क्षमता करणे, प्रत्येक शेतकऱ्यांनी जलतारा करावा, तसेच विविध कृषी विभागाच्या योजनांची माहिती गावबैठकामध्ये द्यावी, अशी माहिती उपस्थितांना दिली.

यावेळी राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त तथा प्रगतशील शेतकरी रत्नाकर ढगे पाटील यांनी सेंद्रिय शेतीचे महत्व, फळबाग लागवड, जमिनीचे आरोग्य कसे सुधारावे, तसेच जमिनीतील कर्ब कशा पद्धतीने वाढवावा याबद्दल शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच प्रगतिशील शेतकरी कृष्णा भालेराव यांनी माती परिक्षणाचे महत्व, बियाणे निवड, बियाणे विकत घेताना घ्यावयाची काळजी याबद्दल सखोल असे मार्गदर्शन केले.

यावेळी प्रगतिशील शेतकरी अनिल मोरे, शंकर पाटील वडजे, नितेश कदम, प्रभाकर व्यवहारे आदींसह सर्व मंडळ कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक, कृषी सहाय्यक आदींसह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषी सहाय्यक संभाजी वडजे यांनी केले. तर आभार मंडळ कृषी अधिकारी एस.एस. गुट्टे यांनी मानले.

नाले, व सांडपाणी वाहिन्यांची तात्काळ सफाई करावी; युवासेनेची पत्राद्वारे मागणी..!

वाघोली (पुणे) ■ स्वरुप गिरमकर



(पुणे) वाघोली : नगर रोड, वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्रमांक ३,४,५ मधील धोकादायक झाडांच्या फांद्या, सांडपाणी वाहिनी, पावसाळी वाहिनी व नाल्यांची तात्काळ साफसफाई करण्याची मागणी उपशहर प्रमुख श्री. शिवप्रसाद जठार यांनी ५ मे २०२५ रोजी पालिकेला दिलेल्या लेखी पत्राद्वारे केली आहे.

पावसाळा सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील अनेक भागांमध्ये झाडांच्या धोकादायक फांद्या नागरिकांच्या सुरक्षेला धोका निर्माण करत आहेत. मागील वर्षी आनंदपार्क, वडगावशेरी या ठिकाणी झाड गाडीवर कोसळून अपघात घडला होता त्याची पुनरावृत्ती परत होऊ नये, त्याचप्रमाणे, अनेक ठिकाणी नाले व सांडपाणी वाहिन्यांमध्ये गाळ साचल्याने पाणी साचण्याचा आणि रोगराई पसरण्याचा तसेच नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो, मागील वर्षी अनेक ठिकाणी पावसाचे पाणी साचले होते, नाले तुडुंब भरून रस्त्यावर, सोसायट्यांमध्ये पाणीच पाणी झाले होते नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागला होता त्याची पुन्हा पुनवृत्ती होऊ नये नागरिकांना तसेच वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये या पार्श्वभूमीवर पत्र देण्यात आले आहे.

श्री. जठार यांनी पालिकेचे लक्ष वेधले आहे की, वेळेत ही कामे न केल्यास पावसाळ्यात नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो. त्यांनी पालिकेकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली असून, जनतेच्या आरोग्य व सुरक्षिततेसाठी ही कामे अत्यावश्यक असल्याचे स्पष्ट केले आहे.

मेघा इंजिनिअरिंग कंपनी विरोधातील श्री उबाळेंच्या आंदोलनाला वाढता पाठिंबा

कोरेगाव ■ अज्जू मुल्ला



कोरेगावः सातारा -- पंढरपूर रस्त्याचे नवीन विस्तारीकरणाचे काम करत असताना प्राचीन वृक्षतोड करण्यात आलेली आहे . त्या जागी नवीन वृक्ष लागवड निविदा मध्ये दिसून येत आहे. परंतु, प्रत्यक्षात ते केले नाही. रस्त्याच्या विस्तारीकरणाच्या कामांमध्ये दिरंगाई केल्यामुळे अनेक अपघात झाले त्याबाबत कोणतीही नुकसान भरपाई न करता हलगर्जीपणा केला आहे. त्यामुळे मनुष्यवधाच गुन्हा दाखल करावा

या मागणीसाठी पीपल्स रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया राज्य उपाध्यक्ष श्री रमेश अनिल उबाळे यांनी उपोषण सुरू केले असून उपोषणाला वाढता पाठिंबा मिळत आहे. उन्हाळ्याची तीव्रता वाढून सुद्धा आंदोलन आंदोलनापासून ठाम आहेत एवढा संताप प्रवाशांमध्ये निर्माण झालेला आहे.

या कंपनीने निविदा नुसार कागदोपत्री दोन लाखाची वृक्ष लागवड करून रस्ते विकास नावाखाली ३० लाख रुपये बेकायदेशीर बचत केली आहे. एवढेच नव्हे तर एक गुन्हा पचला म्हणून दुसरा गुन्हा म्हणजे या भ्रष्ट कंपनीने निकृष्ट दर्जाचे काम केलेले आहे . रस्त्याला काही महत्त्वाच्या गावच्या हद्दीमध्ये भेगा पडलेले बुजवण्याचं काम सध्या चालू आहे. हा पुरावा असून सुद्धा संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग व गुणवंत नियंत्रक आणि संबंधित यंत्रणा कारवाई करण्यापासून अलिप्त राहिलेले आहे.

मेघा इंजीनियरिंग कंपनीने या रस्त्याचे काम काम करत असताना कोणत्याही पद्धतीचे सेफ्टी रुल्स फॉलो केलेले नाही. या रस्त्यावर आजपर्यंत ६४ प्रवासी मृत्युमुखी पावलेले आहेत. त्यांच्या कुटुंबियांना कोणत्याही स्वरूपाचे नुकसान भरपाई मिळालेली नाही. यंत्रणेशी हात मिळवणी करून आज तारखे अखेर एक ही सदोष मनुष्य वधाचा गुन्हा या कंपनीवर दाखल झालेला नाही. हा मोठा अभ्यास करण्याचा व संशोधन करण्याचा विषय आहे .

या रस्ता म्हणजे मौत का कुवा बनलेला आहे. निरापराधी प्रवाशांचे जीव वाचवण्यासाठी आमचे आंदोलन असून जर भ्रष्ट अधिकाऱ्यांना ही बाब किरकोळ वाटत असेल तर कंपनी इतकाच आम्ही लोकवर्गणीतून निधी देऊन त्यांची पैशाची भूक भागू असं या आंदोलनाला पाठिंबा देणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सातारा जिल्हा मागासवर्गीय सेलचे जिल्हाध्यक्ष अमोल पाटोळे, सामाजिक कार्यकर्ते उत्तम गायकवाड, अजय कदम, सलीम बागवान, राजेंद्र पोळ, नितीन राऊत, जमीर भोसले, उत्तम जाधव, किरण चव्हाण व सातारा, कोरेगाव, खटाव, माण तालुक्यातील चार चाकी दुचाकी वर प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी सांगितले.

मंगळवार दिनांक ६ मे पासून सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय नेते आमदार जोगेंद्र कवाडे सर, युवा नेते जयदीप कवाडे यांच्या नेतृत्वाखाली राज्य उपाध्यक्ष श्री रमेश अनिल उबाळे व त्यांच्या समर्थकांनी तसेच प्रवाशांनी आंदोलन सुरू केले आहे.

या आंदोलनाला पहिल्या दिवशी ५० विविध संघटनेने पाठिंबा दिला आहे. यापुढेही आंदोलन तीव्र करण्यासाठी आंदोलनाची दिशा ठरवण्यात येणार असल्याची माहिती आंदोलकांनी दिली आहे. दरम्यान, या आंदोलनाबाबत राज्याचे माजी मंत्री तसेच लोकप्रतिनिधींनीही संपर्क साधून पाठिंबा दर्शवला आहे.

वाई तालुक्यातील सर्व वाळू निविदा रद्द करा ; स्वप्निल गायकवाड : १३ तारखेला घरकुल लाभार्थ्यांना घेऊन कृष्णा नदीत आंदोलन करणार

वाई ■ प्रशांत थोरवे



वाई : प्रधानमंत्री आवास योजनेच्या अंतर्गत घरकुल आम्हाला मंजूर झाले आहे. शासकीय निकषाप्रमाणे आम्ही ते बांधण्यास सुरुवात केली आहे. त्याच्याशी निगडीत पहिला हफ्ता सुध्दा आम्हाला मिळाला आहे. त्याबरोबर शासनाने घरकुल लाभार्थी यांना मोफत वाळू मिळण्यासंबंधी शासन आदेश सुद्धा काढला आहे. त्याअनुषंगाने आम्ही वाळू परवाना मिळण्यासाठी मागील अनेक दिवसांपासून प्रयत्न करत आहोत. आमच्यातील बऱ्याच लाभार्थ्यांना पास मिळूनसुद्धा पंधरा दिवसापेक्षा जास्त कालावधी उलटूनही आजपर्यंत वाळू मिळाली नाही. आमच्यातील शेकडो लाभार्थी यांना तर अद्यापही पास मिळाला नाही. शासनाच्या महाखनिज संकेतस्थळाच्या माध्यमातून अनेक वेळा बुकिंग करण्याचा प्रयत्न केला गेला मात्र ऑफलाइन स्टॉक दाखविला जात नाही. या अनुषंगाने महसूल प्रशासनाने योग्य ती जबाबदारी घेणे गरजेचे होते. एका बाजूने शासन मोफत वाळूसाठी अध्यादेश काढते मात्र दुसऱ्या बाजूने सामान्य घरकुल लाभार्थ्यांना ती वाळू मिळत नाही

शासनाच्या आदेशाची अंमलबजावणी महसूल प्रशासनाच्या माध्यमातून होताना दिसत नाही.

त्यामुळे हा प्रश्न जर येणाऱ्या काळामध्ये सुटला नाही व प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल लाभार्थ्यांना जर वाळू प्राप्त झाली नाही तर मात्र ज्या नदीपात्रातून ही वाळू काढली जाते त्याच कृष्णा नदी पात्रात सामूहिक आत्मदहन करू असा इशारा स्वप्निल गायकवाड यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. सर्वसामान्य घरकुल लाभार्थ्यांना वाळू मिळणार नसेल तर नदीपात्रातील वाळू उपशासाठी देण्यात आलेल्या सर्व निविदा रद्द करण्यात याव्यात असेही निवेदनात म्हटले आहे.

जिल्ह्यातील वायगाव हळद जाणार दुबईला!;भौगोलिक मानांकन प्राप्त वायगाव हळदीला विदेशात मागणी; सन २०२५ मध्ये मध्ये १.५ मे. टन ओली हळद होणार निर्यात

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : समुद्रपूर तालुक्यातील वायगाव येथील वायगाव हळदीला भौगोलिक मानांकन जी.आय टॅग क्रमांक २६८ प्राप्त झाले आहे. हे मानांकन २०१६ मध्ये वायगाव हळद शेतकरी उत्पादक कंपनी लि. गिरड ता. समुद्रपूर यांनी प्राप्त केले आहे. वायगाव भागातील जमिनीत पिकणाऱ्या हळदीच्या विशिष्ट औषधी गुणधर्मामुळे तिला हे मानांकन मिळाले आहे. विदेशात या हळदीला मागणी असून जिल्ह्यातील वायगाव हळद पहिल्यांदाच दुबई येथे निर्यात करण्यात येणार आहे.

आत्मा, ए.पी.ई.डी.ए., आणि युनिव्हर्सल एक्सपोर्टर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात वायगाव हळदीच्या कंटेनरला जिल्हाधिकारी कार्यालयातून दि. ९ मे रोजी जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रवाना करण्यात येणार आहे. सन २०२५ या वर्षात वर्ध्यातून ए.पी.ई.डी.ए., आत्मा आणि युनिव्हर्सल एक्स्पोर्टर यांच्या सहकार्याने जवळपास १.५ मे. टन ओल्या वायगाव हळदीचे निर्यात करण्याचे ठरविले आहे.

या निर्यातीमध्ये कृषिन्नोती शेतकरी उत्पादक कंपनी लिमिटेड, वायगाव (ह.) तालुका समुद्रपूर विदर्भ नैसर्गिक शेतमाल किसान उत्पादक कंपनी लिमिटेड , खैरगाव आणि वायगाव हळद शेतकरी उत्पादक कंपनी लि. गिरड ता. समुद्रपूर या शेतकरी उत्पादक कंपनी यांनी सहभाग घेतलेला आहे. ओल्या हळदीची निर्यात दुबई येथे करण्यात येत आहे. आगामी काळात निर्यातीचे मोठ्या प्रमाणावर पुरवठा आदेश प्राप्त झाल्यास शेतकऱ्यांना याचा निश्चितच फायदा होईल.

वर्धा जिल्हा हा महाराष्ट्रातील हळद उत्पादक जिल्ह्यांपैकी एक आहे. येथील हवामान आणि जमीन हळदीच्या लागवडीसाठी बऱ्यापैकी अनुकूल आहे. समुद्रपूर तालुक्यात १६०.४० हेक्टर क्षेत्रावर हळदीची लागवड केली जाते. यात सिंचनाखालील आणि कोरडवाहू जमिनीचा समावेश आहे. समुद्रपूर तालुक्यातील वार्षिक हळद उत्पादन सुमारे ५६१.४० मेट्रिक टन इतके आहे.

वायगाव हळदीची खास वैशिष्ट्ये

वायगावची हळद गडद पिवळ्या रंगाची, म्हणजेच केशरी रंगाकडे झुकलेली असते. इतर हळदीच्या तुलनेत तिचा रंग अधिक आकर्षक असतो. या हळदीमध्ये कुरकुमीनचे प्रमाण खूप जास्त असते, जे साधारणपणे ६ टक्क्यापेक्षा अधिक असते. कुरकुमीन हे हळदीतील एक महत्त्वाचे बायोॲक्टिव्ह संयुग आहे, ज्यामुळे हळदीला औषधी गुणधर्म मिळतात. वायगावच्या हळदीची चव तीव्र आणि सुगंध आकर्षक असतो. त्यात तेल अंश भरपूर असतो. या हळदीची पावडर अत्यंत मऊ आणि बारीक असते. पारंपारिकरित्या, वायगावची हळद जखमांवर आणि सर्दी-खोकल्यावर गुणकारी मानली जाते. तिच्यातील उच्च कुरकुमीनमुळे तिला अनेक आरोग्यदायी फायदे आहेत.

हिंदी विश्वविद्यालयातील डॉ. जयंत उपाध्याय यांची अ.भा.दर्शन परिषदेच्या सहसचिव पदी निवड

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयातील दर्शन व संस्कृती विभागाचे माजी अध्यक्ष, असोशिएट प्रोफेसर डॉ. जयंत उपाध्याय यांची अखिल भारतीय दर्शन परिषदेच्या सहसचिव पदी निवड झाली आहे. परिषदेचे ६९ वे अधिवेशन नुकतेच झारखंड येथील राची विद्यापीठात पार पडले, यावेळी झालेल्या आमसभेत परिषदेच्या कार्यकारणीचे गठन करण्यात आले. यात सर्व संमतीने डॉ. जयंत उपाध्याय यांना सहसचिव निवडण्यात आले. त्यांना मागील वर्षी कश्मीर विश्वविद्यालय श्रीनगर येथे आयोजित ६८ व्या अधिवेशनात प्रोफेसर अशोक कुमार चॅटर्जी स्मृती सन्मान देण्यात आला होता. अखिल भारतीय दर्शन परिषदेचे ६५ वे अधिवेशन ऑगस्ट २०२१ मध्ये महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात आयोजित करण्यात आले होते, यात आयोजित म्हणून डॉ. जयंत उपाध्याय यांची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली होती. अखिल भारतीय दर्शन परिषद ही सर्वाधिक आजीवन सदस्य असणारे संस्था म्हणून ओळखली जात असून संस्थेचे जवळपास तीन हजार आजीवन सदस्य आहेत.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकासमहामंडळाची नकारात्मक व चुकीची माहिती देणाऱ्या प्रलोभनांना बळी पडू नका

नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर : अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ महाराष्ट्र शासनाचा उपक्रम असून सदर महामंडळाच्या योजना प्रामुख्याने मराठा प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या घटकासाठी आहे. या प्रवर्गातील तरुण, तरुणीना उद्योजक होण्यास प्रोत्साहन देऊन त्यांचे सबलीकरण करण्यासाठी महामंडळची व्याज परतावा योजना महत्वाची आहे. या योजनांच्या सहाय्याकरीता महामंडळाचे मुंबई मुख्यालय व जिल्हानिहाय जिल्हा समन्वयकांच्या व्यतिरिक्त इतर कोणतीही यंत्रणा उपलब्ध नाही. त्यामुळे कोणत्याही प्रसार माध्यमाद्वारे / फेसबुक/ व्हाट्सॲप/ खाजगी व्यक्ती / संस्थेच्या प्रलोभनाला बळी पडू नये, असे आवाहन जिल्हा समन्वयक प्रियंका उ.कपले यांनी केले आहे.

अधिक माहिती करिता नवीन प्रशासकिय इमारत क्र. २. दुसरा माळा, (विंग ए), सिव्हील लाईन्स, नागपूर येथे संपर्क साधावा. माहिती udyog.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिटच्या अनुषंगाने विशेष कार्यक्रम

मुंबई ■ वृत्तसंस्था



ध्वनी चित्र रंजन या विशेष कार्यक्रमाचे आयोजन; शनिवार दि. ३ मे रोजी वर्धा येथे करण्यात आले.

सांस्कृतिक कार्य विभाग हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचे जतन वहन व संवर्धनाचे कार्य करत असतात. त्या अनुषंगाने महाराष्ट्रात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यंदा ०१ ते ०४ मे २०२५ दरम्यान वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समीटचे आयोजन जिओ कन्व्हेन्शन सेंटर, वांद्रे, मुंबई या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यात वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समीटच्या अनुषंगाने ध्वनी चित्र रंजन या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचाच भाग म्हणून वर्धा जिल्ह्यातही या विशेष कार्यक्रमाचे आयोजन शनिवार दि. ३ मे रोजी वंजारी चौक येथील पुण्यशोल्क अहिल्याबाई होळकर, स्मारक व सभागृह येथे पार पडला.

संयुक्त महाराष्ट्राचा पोवाडा, 'मनोरंजन आणि जाहिरात क्षेत्रातील स्थान, नृत्य सादरीकरण, महाराष्ट्र गीतांची मेलडी, स्थानिक लोककला नृत्य सादरीकरण, स्थानिक वाद्य जुगलबंदी, नाट्यगीत, चित्रपट गीत, लोकनृत्य, लोकगीत, लोकधारा असे विविध कार्यक्रमाची सादरीकरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे स्थानी, मा.श्री. संजय इंगळे तीगावकर (विशेष कार्यकारी अधिकारी सावंगी मेघे), मा. श्री. समीर पेंडके(सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती, वर्धा), मा.श्री. नरेश उगेमुगे (वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी महिला आर्थिक विकास महामंडळ, वर्धा), मा.श्री.दिलीप रोकडे (ज्येष्ठ संगीतकार, वर्धा) लोकगीतांचा कार्यक्रमात, गायिका मा.सौ. खुशबू काठाने मॅडम, मा.श्री. श्याम सरोदे सर, मा.श्री.नितीन वाघ सर, मा.श्री.अजय गलांडे सर आणि सुंदर नृत्य आविष्कार सैं.मुस्कतफै सादर करण्यात आले, या सर्व स्थानिक कलाकारांच्या सहयोगाने पार पडलेला सुंदर लोककलेचा जागर हा कार्यक्रम श्री.प्रतीक सूर्यवंशी नाट्यप्रातिक थिएटर अकॅडमी यांच्या सहयोगाने पार पडला.

या कार्यक्रमाची संकल्पना ॲड आशिष शेलार, सांस्कृतिक कार्य तसेच माहिती व तंत्रज्ञान मंत्री यांची असून या कार्यक्रमास श्री विकास खारगे मुख्यमंत्र्याचे अपर मुख्य सचिव तथा अपर मुख्य सचिव सांस्कृतिक कार्य विभाग यांची मार्गदर्शन लाभले आहे या कार्यक्रमाचे नियोजन श्री विभीषण चवरे संचालक सांस्कृतिक कार्य संचालनालय यांनी केले आहे.

पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन



वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा : १०० दिवसाच्या पंधरवडा कार्यक्रमांतर्गत यशवंत महाविद्यालय वर्धा येथे दि. ९ मे रोजी सकाळी ११ वाजता पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मेळाव्यास नोकरी इच्छूक उमेदवारांनी मुळ शैक्षणिक पात्रतेच्या प्रमाणपत्रासह उपस्थित राहावे, असे आवाहन कौशल्य विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त यांनी केले आहे.

जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व यशवंत महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यामाने आयोजित पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्यात प्रामुख्याने संसुर सृष्टी प्रा. लि.कंपनी, इवोनिथ कंपनी भूगाव, एलआयसी, हिंगणघाट, टीएसपीएल कंपनी नागपूर, तसेच संस्कार ?ग्रो प्रा.लि.वायगाव आदी कंपन्या सहभागी होणार असून त्यांच्याकडे रिक्त असलेल्या पदाकरीता इच्छुक पात्र उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखती घेऊन निवड प्रक्रिया पार पाडणार आहे. त्याकरीता १० वी, १२ वी, आयटीआय, बीई पास ते पदवीधर असणे आवश्यक आहे. यासाठी उमेदवारांचे वय १८ ते ४० वर्ष असणे आवश्यक आहे. असे जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजक मार्गदर्शन केंद्र यांनी कळविले आहे.

वर्धा तालुक्यातील ८१ हजार २१२ लाभार्थ्यांना मिळणार ई-शिधापत्रिका

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : मुख्यमंत्री यांच्या १०० दिवस अभियानात नाविण्यपूर्ण उपक्रमांतर्गत छत्रपती श्री शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत वर्धा तहसील प्रशासनाच्यावतीने तालुक्यातील ८१ हजार २१२ पात्र लाभार्थ्यांना गावोगावी शिबारामार्फत ई-शिधापत्रिका वितरित करण्यात येत आहे.

ई- शिधापत्रिका वाटपाचा शुभारंभ सेवा पंधरवडा कार्यक्रमात पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्याहस्ते दुर्धर आजारग्रस्त, दिव्यांग व विधवा लाभार्थ्यांना ई-शिधापत्रिका वाटप करुन शुभारंभ करण्यात आला होता. यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी. मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान आदी उपस्थित होते. देवळी विधानसभा मतदार संघाअंतर्गत येणाऱ्या वायफड, आंजी (मोठी), सेलुकाटे या गावांमध्ये शिबिर आयोजित करुन आमदार राजेश बकाने यांच्या हस्ते लाभार्थ्यांना अंत्योदय व प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजनेचा लाभ देण्यात येत आहे. तसेच नाव कमी करणे, दुय्यम शिधापत्रिका तसेच महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ लाभार्थ्यांना शिबिराच्या माध्यमातून देण्यात येत आहे.

वर्धा तालुक्यातील पात्र शिधापत्रिका धारक ८१ हजार २१२ असून त्यामध्ये अंत्योदय योजनेचे ८ हजार ३०९, प्राधान्य गट योजनेचे ६२ हजार ८४९, शेतकरी ३८८ व एन.पी.एच शिधापत्रिका ९ हजार ६७२ पात्र शिधापत्रिका धारकांचा समावेश आहे. वर्धा तालुक्यातील काही गावांमध्ये पहिल्या टप्प्यामध्ये लाभार्थ्यांना घरपोच शिधापत्रिका वितरित करण्यात आल्या असून उर्वरित गावांमध्ये टप्प्याटप्प्याने लाभार्थ्यांना ई-शिधापत्रिका वितरित करण्यात येत आहे. नागरिकांची गैरसोय थांबावी तसेच नागरिकांना शिधापत्रिका सुलभ उपलब्ध व्हावी यासाठी वर्ध्याचे तहसीलदार संदीप पुंडेकर व पुरवठा विभागाच्या निरीक्षण अधिकारी मनिषा माजरखेडे यांच्या संकल्पनेतून हा नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे.

नागरिकांना शिधापत्रिकेसंबंधी कुठलीही समस्या असल्यास तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाच्या कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन निरीक्षण अधिकारी मनिषा माजरखेडे यांनी केले आहे.

पालकमंत्र्यांच्या हस्ते अवयव दात्यांचा सत्कार

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : अवयवदान व अवयव प्रत्यारोपणासंदर्भात येणाऱ्या अडचणी दूर करण्याकरीता व अवदानाबाबत समाजात जनजागृती व्हावी तसेच जिवंतपणी व मरणोपरांत अवयवदान जिल्ह्यात व्हावे या उद्देशाने जिल्हा सामान्य रुग्णालयाच्यावतीने महाराष्ट्र दिनी मुख्यध्वजारोहण कार्यक्रमात पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते पदमाकर पेठकर व रत्नमाला डोंगरे या अवयव दात्यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा पोलीस अधिक्षक अनुराग जैन, अप्पर जिल्हाधिकारी नरेंद्र फुलझेले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुमंत वाघ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रा.ज.पराडकर यांची उपस्थिती होती.

मस्तिक स्तंभ मृत्यु आल्यास जवळच्या नातेवाईकांनी संपूर्ण अवयवदान करण्याचा निर्णय घेतला पाहिजे. जेणेकरुन अवयव निकामी झालेल्या गरजू रुग्णास दानात मिळालेल्या अवयवांचा फायदा होईल. अवयव घेणारे लाभार्थी आदित्य पेटकर आणि प्रियदर्शनी डोंगरे यांनी आपल्या मनोगतात आजचा दिवस आमच्या आयुष्यातील अत्यंत भावनिक आणि अभिमानास्पद क्षण आहे. अवयवदानामुळे आम्हाला नवीन जीवनदान मिळाले आम्हाला दिलेले हे सुंदर जीवन नक्कीच सार्थक करु अशा भावना व्यक्त केल्या व संपूर्ण समाजातील लोकांनी अवयवदानाचे महत्व लक्षात घेऊन अवयवदान मोहिमेत सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमामध्ये उपस्थितीत डॉ. प्रविण धाकटे, जिल्हा नेत्र शल्य चिकित्सक डॉ. मनोज सक्तेपार, नाक, कान व घसा शल्य चिकित्सक डॉ. प्रशांत पवार, नेत्रदान समुपदेशक पी.एस.काकडे यांनी सहकार्य केले.

वर्धेच्या विकासात क्रेडाईचे योगदान महत्वपूर्ण : पालकमंत्री डॉ. पंकज भोयर

क्रेडाईच्या नवनियुक्त अध्यक्ष व सचिवांची पालकमंत्र्यांनी केला सत्कार

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : शहराच्या विकासात अनेकांचे हातभार लागले असले तरी क्रेडाई संघटनेचे योगदान मोठे आहे. मागील तीन दशकात शहराचा जो झपाट्याने विकास झाला त्यात क्रेडाईची भूमिका महत्वाची आहे. नवनियुक्त पदाधिका-यांनी गुणवत्तेची परंपरा कायम ठेवावी, असे प्रतिपादन राज्याचे गृह ग्रामीण, शालेय शिक्षण, गृहनिर्माण, सहकार व खनिकर्म राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केले.

बांधकाम क्षेत्रातील क्रेडाई संघटनाना एक मोठी संघटना म्हणून नावारूपास आलेली आहे. संघटनेच्या नवीन अध्यक्ष, सचिव व कोषाध्यक्षांची सन २०२५ ते २०२७ या कालावधीसाठी निवड करण्यात आली आहे. नवनियुक्त पदाधिका-यांचा पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते सत्कार आला. विश्रामगृह येथे आयोजित कार्यक्रमाला सुधाकर साटोणे, नवनियुक्त अध्यक्ष महेश गुल्हाणे, सचिव अजय वझुरकर, कोषाध्यक्ष रमाकांत मस्के, संजय मानमोडे, नितीन गावंडे, चंद्रसेन यादव आदी मंचावर उपस्थित होते. नितीन गावंडे यांनी संघटनेच्या कार्याची माहिती व सुरू असलेल्या उपक्रमाची माहिती दिली.

पुढे बोलतांना पालकमंत्री डॉ. भोयर म्हणाले की, क्रेडाई संघटनेने चांगले कार्य केले आहे. बांधकाम क्षेत्रात अनेक बदल झपाट्याने होत आहे. या बदल्याचे स्थानिक क्रेडाईच्या सदस्यांनी अध्ययन करण्याची गरज आहे. मुंबई देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबईत गृहनिर्माणचे अनेक प्रकल्प सुरू असून नव नवीन संकल्पना अंमलात येत आहे. मुंबईशी आपल्या शहराची तुलना होऊ शकत नाही. परंतु यातील काही संकल्पना शहरात राबवून शहराचे रूपडे पालटू शकते शिवाय धर धारकांना चांगल्या सुविधा मिळू शकतात. मुंबईतील प्रकल्पाची पाहणी करण्यासाठी व शहराच्या विकासासाठी क्रेडाईला सतत सहकार्य करू, अशी ग्वाही पालकमंत्री डॉ. भोयर यांनी दिली. याप्रसंगी नवनियुक्त अध्यक्ष महेश गुल्हाणे यांनी संघटना भविष्यात देखील चांगले कार्य करेल. यासाठी सर्वांचे सहकार्य अपेक्षित असल्याचे ते म्हणाले. यावेळी नवनियुक्त अध्यक्ष महेश गुल्हाणे, सचिव अजय वझुरकर व कोषाध्यक्ष रमाकांत मस्की यांचा पालकमंत्री भोयर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला राजू ढोबळे, सुरेंद्र महाकाळकर, प्रदीप रिठे, सुनिल बुरांडे, राजेंद्र जैन, रमाकांत मस्की, साहीर ईसाजी, योगेश गावंडे, धनराज भालेराव, हेमंत देशमुख, अनिल गुल्हाणे, प्रमोद श्रीराव, निखील साहू, दीपक मांडवकर, निखीलेश देशमुख, हर्षल शेगांवकर, प्रदीप गिरडकर, गणेश ढवळे, प्रवीण जैन, विक्रांत तळवेकर, गजेंद्र कापडे, ऋषभ ठाकरे, राहूल संदीलवार, चंद्रसेन यादव यांच्या सह क्रेडाईचे सदस्य उपस्थित होते. संचालन नितीन गावंडे यांनी केले.

सागर मेघे सर यांच्या वाढदिवसानिमित्य रक्तदान शिबिराचे आयोजन




वर्धा ■ प्रतिनिधी

सागर मेघे फाउंडेशनचे मार्गदर्शक व प्रेरणास्थान आदरणीय श्री.सागर मेघे सर यांच्या वाढदिवसानिमित्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते . या शिबिराला तप्त उन्हामध्ये देखील सागर मेघे फाउंडेशनच्या मित्र परिवाराने उत्स्फुर्त प्रतिसाद दिला . रक्तदान शिबिरामध्ये १०५ रक्तदात्यानी रक्तदान केले .उद्घाघाटन हॉस्पिटलचे मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ.चंद्रशेखर महाकाळकर ,विशेष कार्यकारी अधिकारी श्री.संजय इंगळे तिगावकर यांच्या हस्ते करण्यात आले . यावेळी प्रशासकीय अधिकारी श्री.राजेश सव्वालाखे ,डॉ.विठ्ठल शिंदे, रक्तपिढी विभागाकडून जगदीश देशमुख , विवेक हजारे ,विनोद बेसेकर ,भावना सिस्टर सागर मेघे फॉउंडेशनच्या वतीने संस्थापक अध्यक्ष संदीप कुत्तरमारे , उपाध्यक्ष उमाकांत काळे ,आकाश रामटेके ,किशोर शेंडे , प्रशांत कांबळे, राकेश अगडे, जितेंद्र आगलावे ,गौतम तामगाडगे, महिंद्रा थूल ,अर्जुन डुकरे , निलेश राजूरकर , विश्वास नगराळे ,संदीप ताकसांडे , रवी कळणे , संजय मेघे , संदीप करडे, मनोज अनकर , प्रवीण मेघे , राकेश गुबे ,श्रीकांत बोदडे ,नीलम डोळे, अमोल भोयर , संदीप कांबळे , अमोल नांदुरकर ,नितेश बुरबुरे ,सागर कुत्तरमारे ,सुनील कांबळे , रिजवान अली , पंकज चहांदे , मुन्ना गौतम , प्रीतम हाडके उपस्थित होते .

स्व. निर्धन पाटील वाघाये कॉलेजचा घवघवीत निकालः अवंति शिंगणजुडे तालुक्यात प्रथम, यश हलमारे विज्ञानात द्वितीय!

भंडारा ■ प्रतिनिधी




भंडारा : लाखनी - स्व. निर्धन पाटील वाघाये कनिष्ठ महाविद्यालय, लाखनी येथे २०२५ च्या एएण (बारावी) परीक्षेत विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. यंदाचा महाविद्यालयाचा एकूण निकाल ८९इ लागलेला असून, विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत तालुकास्तरावर आपले नाव उज्वल केले आहे.

विज्ञान शाखेत, यश अनिल हलमारे याने ८५इ गुण मिळवत लाखनी तालुक्यात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. त्याच्या यशामध्ये आई-वडील व गुरुजनांचा मोठा वाटा असल्याचे त्याने सांगितले. त्याचे स्वप्न घ्ळ मधून सॉफ्टवेअर इंजिनिअर होण्याचे आहे.

याच शाखेत हिमांशू श्रीधर वाघाये याने ७४.८३इगुण मिळवत द्वितीय तर चिन्मय दीपक कोहळे याने ७०.६७इगुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला आहे.

कला शाखेत, अवंति उमेश शिंगणजुडे हिने ८१.८३इ गुण मिळवून तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे. तिचे स्वप्न एल.एल.बी. करून एक यशस्वी वकील बनण्याचे आहे.

कला शाखेत रिया देवराम सार्व्हे हिने ५०इगुणांसह द्वितीय तर बादल नितेश तिरपुडे याने तृतीय क्रमांक पटकावला आहे.

या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा महाविद्यालयात लक्ष्मी शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष सरोजताई सेवक वाघाये, सचिव सुधीर कुकडे, प्राचार्य गणेश कापसे, तसेच प्रा. मनीषा सपाटे, प्रा. स्मिता तितरमारे, प्रा. येसोमती कागदे, प्रा. ज्ञानेश्वरी रहांगडाले, प्रा. मंगेश कुकडे, प्रा. मुन्ना हलमारे, प्रा. कैवल्यदास सूर्यवंशी, प्रा. गाढवे, प्रा. उमरकर आणि खेमराज वाघाये यांच्या हस्ते अभिनंदन करण्यात आले. सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्याच्या शुभेच्छा दिल्या.

या यशस्वी निकालामध्ये शिक्षकवृंदांचे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांची मेहनत आणि पालकांचा सहभाग महत्त्वपूर्ण ठरला आहे. यावेळी संस्थापक . सेवकभाऊ वाघाये पाटील यांनी देखील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

स्व. निर्धन पाटील वाघाये महाविद्यालयात ११ वी विज्ञान व कला शाखा, बी.एससी., बी.ए., एम.ए. इतिहास व समाजशास्त्र अशा प्रकारचे को-एज्युकेशन दिले जाते. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे.

मॉडेल कनिष्ठ महाविद्यालय रोहनाचा निकाल ९१ टक्के ; वाणिज्य विभाग १०० टक्के



कारंजा (घा.) ■ सिध्दार्थ सोमकुवर

कारंजा : नुकत्याच जाहीर झालेल्या उच्च माध्यमिक परीक्षेचा निकाल जाहीर झाला यामधून मॉडेल कनिष्ठ महाविद्यालय रोहनाचा निकाल एकूण ९१इ लागला यामधून वाणिज्य विभागाचा १००इ व कला विभागाचा ८८इ लागून ग्रामीण भागामध्ये निकालाची परंपरा राखून ठेवली यामध्ये वाणिज्य विभागातून प्रथम क्रमांक अखिलेश पाटील याला ७७.८३ कुमारी दिक्षिता काळे ७५.८३ तृतीय क्रमांकाने रोहित आंजीकर याला ७५.५० गुण मिळाले

कला विभागातून सुमित गडापाले याला प्रथम क्रमांकाचे गुण मिळाले द्वितीय क्रमांकाने श्रेया भगत व तृतीय क्रमांकाने श्रुतिका धुर्वे उत्तीर्ण झाली बारावीत उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे भारत शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा ॲडव्होकेट शोभाताई काळे सचिव संदीपभाऊ काळे

मॉडेल कनिष्ठ महाविद्यालय रोहाणा चे प्राचार्य राजेंद्र सुपनर विभाग प्रमुख प्राध्यापिका अंजली रघाटाटे प्रा. सुदर्शन शिंदे प्रा प्रदीप झुटी प्रा. अभिजित काळे प्रा मनीष सावरकर प्रा लक्ष्मण कुंभरे प्रवीण शिरपूरकर कु.हिवसे आदी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आदींनी या उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

अल्लीपूरात पिण्याच्या पाण्याचा कृत्रिम तुडवडा; महाविकास आघाडीचे ग्रामविकास अधिकारी यांना निवेदन

देवळी ■ सौ.आरती गोसटकर/कारंजेकर



देवळी : पुलगाव मतदारसंघातील अल्लीपूर हे गाव लोकसंख्येच्या दृष्टीने मोठे असून या गावाला कृत्रिम पाणी टंचाईचा त्रास सहन करावा लागतो आहे.

लोकसंखेने मोठ्या असलेल्या अल्लीपूर गावात मागील अनेक वर्षापासून पाणी टंचाई होती,मात्र तत्कालीन लोकप्रतिनिधी माजी आमदार रणजित कांबळे यांनी गावाला पाणी टंचाईतून मुक्त करण्यासाठी'जीवन प्राधिकरण' योजना राबवली, आणि गावाला पाणी टंचाईतून मुक्त करण्याच काम केले होते,परंतु यानंतर जीवन प्राधिकरण (जिल्हा परिषद पाणी पुरवठा) आणि जल जीवन मिशन अंतर्गत 'हर घर जल ,हर घर नल' ही योजना राबविण्यात आली त्याचे काम पण मोठ्या प्रमाणात ग्रामपंचायत स्तरावर करण्यात आले. परंतु,लोकप्रतिनिधींच्या आणि प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे सदर योजना फोल ठरल्याचे चित्र दिसून येत आहे,अल्लीपूर गावाला पाणी टंचाई जाणवत आहे,एकीकडे मोठ्या प्रमाणात नळपाणी शुल्क वसुली करायची,दुसरीकडे लोकांना पाण्यासाठी भटकंती करायला लावायची या चुकीच्या धोरणाविरुद्ध आज महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांनी आक्रमक होत थेट ग्रामविकास अधिकारी यांना पाण्याचे नियोजन करून सुरळीत पाणीपुरवठा करावा किवा ज्या भागात पाणी पोहचत नाही अश्या भागात टँकरने पाणीपुरवठा करण्यात यावा व गावातील प्रत्येक भागापर्यंत शुद्ध पाणी पोहचावे अश्या आशयाचे निवेदन दिले आहे,यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे गजानन नरड,सचिन पारसडे,कांग्रेसचे श्रीराम साखरकर,शिवसेनेचे गोपाल मेघरे,शिवराया संघटनेचे नितीन सेलकर,उमेश ढगे ,अमरदीप कांबळे,रोशन नरड,विकास गोठे ,रत्नाकर वैद्य,वसीम कुरेशी,समीर शेख व आदी गावकरी उपस्थित होते.

आन्या उजवणे बारावीत जिल्ह्यात अव्वल, खासदार डॉ. पडोळेंकडून सत्कार

भंडारा ■ प्रतिनिधी



भंडाराः भंडारा जिल्ह्यातील नूतन कन्या कनिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थिनी, कुमारी आन्या रंजीत उजवणे, हिने इयत्ता बारावीच्या नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात वाणिज्य शाखेतून तब्बल ९७.८३इगुण मिळवत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या या यशामुळे तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

या उत्तुंग यशाबद्दल भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांनी आन्याचे विशेष कौतुक केले. डॉ. पडोळे यांनी आन्याच्या निवासस्थानी स्वतः जाऊन तिची भेट घेतली, तिला पुष्पगुच्छ देऊन तिचा सत्कार केला आणि तिच्या अभ्यासाविषयी आस्थेने विचारपूस केली. आन्याने यावेळी आपण भविष्यात सीएबनू इच्छित असल्याचे सांगितले. खासदार महोदयांनी तिला तिच्या पुढील उज्ज्वल वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना डॉ. पडोळे म्हणाले, 'आन्याने केवळ स्वतःच्या कुटुंबाचेच नव्हे, तर संपूर्ण भंडारा जिल्ह्याचे नाव मोठे केले आहे. तिचे हे यश आम्हा सर्वांसाठी अत्यंत अभिमानास्पद आहे.' त्यांनी आन्याच्या या यशात तिच्या आई-वडिलांचा, भाऊ-बहिणींचा आणि तिला मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचा मोलाचा वाटा असल्याचे सांगत त्यांचेही अभिनंदन केले.

आन्याच्या या यशाने नूतन कन्या कनिष्ठ महाविद्यालयासह संपूर्ण भंडारा जिल्ह्यात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण पसरले आहे. तिच्या यशाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

नंबरप्लेटसाठी अतिरिक्त शुल्क घेणाऱ्या सेंटरचे काम शासनाने बंद करुन नोटीस केली जारी

नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर : १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांकाची पाटी ३० जून २०२५ पर्यंत बसविण्याचे परिवहन विभागाने निर्देश आहेत. यासाठी वाहननिहय जीएसटीसह शासनाने दर निश्चित करुन दिले असून या नंबरप्लेट बसविण्यासाठी ठरावीक संस्थांची निवड केली आहे. यातील झेन टीव्हीएस मोबीलीटी व्हेंचर प्रायव्हेट लिमिटेड या सेंटरने ठरवून दिलेल्या दरापेक्षा अतिरिक्त दर घेतल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या सेंटरला नोटीस बजावण्यात आली असून सदर फिटमेंट सेंटरचे काम बंद करण्यात आल्याची माहिती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अविनाश राऊत यांनी प्रसिध्दीपत्रकान्वये दिली आहे. शासनाने ठरवून दिलेल्या शुल्काव्यतिरिक्त कोणी अतिरिक्त शुल्काची मागणी केल्यास त्याची माहिती तत्काळ द्यावी, असे आवाहन त्यांनी केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय कार्यकर्त्यांना बळ देणाराः बावनकुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे विकासाला गती मिळणार

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : सर्वोच्च न्यायालयाने आज स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत महत्वपूर्ण निर्णय घेतला असून, कार्यकर्त्यांच्या हक्काचे दान त्यांच्या पदरात टाकले आहे. हा निर्णय लोकशाहीला बळकट करणारा असून, महाराष्ट्राच्या विकासाला गती देणारा ठरेल, असे मत भाजपा प्रदेशाध्यक्ष आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मगावी, चौंडी येथे मंत्रिमंडळाच्या बैठकीदरम्यान हा निर्णय आल्याने या पावनभूमीचा मान वाढल्याचेही त्यांनी नमूद केले.

बावनकुळे म्हणाले, गेल्या तीन वर्षांपासून आम्ही या क्षणाची वाट पाहत होतो. सर्वोच्च न्यायालयाने लोकशाही व्यवस्थेला बळकट करणारा हा निर्णय घेतला आहे. मी न्यायालयाचे मनःपूर्वक स्वागत करतो,' या निर्णयामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच होणार असून, कार्यकर्त्यांचा उत्साह द्विगुणित झाला आहे. 'कार्यकर्ते तन-मन-धनाने समाजसेवा करतात. आज त्यांच्या चेहऱ्यावरचे हसू नक्कीच फुलले असेल,' असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाचा विशेष उल्लेख करत बावनकुळे म्हणाले, 'मुख्यमंत्र्यांनी कायदेपंडितांशी सतत सल्लामसलत करून हा विषय मार्गी लावला. त्यांच्या प्रयत्नांना आज यश प्राप्त झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या संकल्पाला आणि मुख्यमंत्र्यांच्या विकसित महाराष्ट्राच्या दृष्टिकोनाला या निवडणुका गती देतील.'

गेल्या आठवड्यात केंद्र सरकारने जातीनिहाय जनगणनेचा मोठा निर्णय घेतला. त्याचप्रमाणे आजच्या न्यायालयीन निर्णयाने जनतेच्या आशा-आकांक्षांना बळ मिळाले आहे. 'हा निर्णय कार्यकर्त्यांचा आहे. येणारी निवडणूक कार्यकर्त्यांची आहे. त्यांच्या समर्पणाला आणि सेवेला हा विजय आहे,' असे बावनकुळे यांनी ठामपणे सांगितले. न्यायदानासाठी प्रसिद्ध असलेल्या अहिल्यादेवी होळकर यांच्या या पावनभूमीत हा निर्णय आला, याचा आम्हाला विशेष अभिमान आहे,' असे बावनकुळे यांनी नमूद केले.

या निर्णयामुळे महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला असून, विकासाच्या नव्या अध्यायाला सुरुवात होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सर्व कार्यकर्त्यांना शुभेच्छा देत त्यांनी या विजयाचा आनंद साजरा करण्याचे आवाहन केले.

राजश्री शाहू महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त भंडारा भीम आर्मीचे अभिवादन

भंडारा ■ प्रतिनिधी



भंडाराः आरक्षणाचे जनक आणि सामाजिक न्यायाचे थोर प्रणेते, राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त भीम आर्मी जिल्हा संघटन, भंडारा तर्फे स्थानिक सर्किट हाऊस येथे विनम्र अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी भीम आर्मीचे अनेक मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमास भीम आर्मीचे विदर्भ उपाध्यक्ष रुपेश गोस्वामी, जिल्हा प्रभारी विक्रांत भालाधरे, वरिष्ठ जिल्हा उपाध्यक्ष प्रभाकर मेश्राम, जिल्हा संपर्क प्रमुख अश्विन गोस्वामी यांची विशेष उपस्थिती होती. तसेच, भंडारा तालुका अध्यक्ष चेतन कानेकर, मोहाडी तालुका अध्यक्ष संजय बासनी आणि महेंद्र बन्सोड , शुभम लोणारे, यांनीही कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला.

कार्यक्रमादरम्यान, उपस्थितांनी राजश्री छत्रपती शाहू महाराजांच्या सामाजिक समता आणि न्यायाच्या विचारांवर सखोल चर्चा केली. महाराजांनी समाजातील वंचित व उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी केलेल्या अथक प्रयत्नांचे आणि त्यांच्या दूरदृष्टीचे स्मरण करण्यात आले. त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेत सामाजिक सुधारणा आणि वंचितांच्या हक्कांसाठी एकजुटीने काम करण्याचा निर्धार यावेळी सर्व पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचा समारोप छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आणि विनम्र अभिवादन करून करण्यात आला. त्यांच्या कार्याला उजाळा देत श्रद्धांजली वाहण्यात आली.

तायवाडे कनिष्ठ महाविद्यालय महादुला - कोराडीतील विद्यार्थ्यांचे सुयश

कोराडी ■ दिलीप येवले

कोराडी : श्री सच्चिदानंद शिक्षण संस्थेद्वारा संचालित तायवाडे कनिष्ठ महाविद्यालय महादुला - कोराडीचा विज्ञान शाखेचा निकाल ९९.५० टक्के तर कला व वाणिज्य शाखेचा निकाल ९७.००इलागला असून विज्ञान शाखेतून साक्षी दिपक पंजाबी ९०.८३इ, खुशी रमेश वानखेडे ९०.१७ इ , सुजल राजेंद्रकूमार लांडे ८७.५० इ , साक्षी ललीत हेडाऊ ८४.५०इ, मनिषा नरेश राना ८३.१७इ , ध्रूव पवन नारायणी ८२.८३इ, रौनक संतोष कोल्हे ८२.५० इ , भार्गवी हरिषकूमार अगस्ती ८२.००इ ,पुर्वा दिनेश कामडी ८१.१७ या विद्यार्थ्यांनी ८० इ च्या वर गुण घेवून या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे नाव लौकीक केले .यासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.शरयू तायवाडे तसेच विज्ञान विभागप्रमुख प्रा.वर्षा कोटकर , प्रा . विवेक महाजन , प्रा . रविंद्र बोरकर ,प्रा. प्रशांत माहुरे व डॉ.वकील शेख यांनी अभिनंदन केले .

महाविद्यालयाच्या प्राचार्य व शिक्षकांचे उत्कृष्ट नियोजन आणि विद्यार्थी व शिक्षकांचे एकत्रितपणे असलेल्या प्रयत्नांमुळे १०० इ निकालाची यशस्वी परंपरा कायम राखली आहे . सर्व यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. शरयु तायवाडे आणि सर्व प्राध्यापक वृदांनी हार्दिक अभिनंदन करुन भावी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.

छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेत छत्रपती शाहू महाराजांना अभिवादन



कोराडी ■ दिलीप येवले

कोराडी : छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेद्वारा संचालित सरस्वती हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय बोखारा तसेच सरस्वती भवन कॉन्व्हेंट अँड हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने राजश्री शाहू महाराज यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाला संस्थेचे संस्थापक सचिव डॉ मारोती वाघ अध्यक्ष म्हणून लाभले तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेच्या संचालिका प्राचार्या लता वाघ उपस्थित होत्या. संस्थेच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे संचालक डॉ.मारोती वाघ यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या अथांग समाज कार्याविषयी मार्गदर्शन केले, प्रमुख अतिथी लाभलेल्या संस्थेच्या संचालिका तसेच सरस्वती हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य लता वाघ यांनी राजश्री शाहू महाराज यांच्या जीवन कार्याविषयी व शैक्षणिक योगदाना विषयी मार्गदर्शन केले. तसेच वरिष्ठ शिक्षक विजय वनकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुनीता नागपुरे यांनी प्रास्ताविक प्रा.आनंद ठाकरे तसेच आभार प्रा.वंदना ठाकरे यांनी मानले या कार्यक्रमाला संस्थेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

ऑल इंडिया समता सैनिक दल वर्धाच्या वतीने चार दिवसीय प्रशिक्षण शिबिर संपन्न

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : ऑल इंडिया समता सैनिक दल वर्धा वर्धा व कुसुम महिला बहुउद्देशीय संस्था च्या वतीने चेतना महाविद्यालय मध्ये चार दिवसीय प्रशिक्षण शिबिर ऑल इंडिया समता सैनिक दल वर्धा चे विदर्भ सचिव रमेश निमसडकर यांच्या हस्ते प्रशिक्षणाचे उद्घाटन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.अशोक चोपडे व प्रमुख अतिथी म्हणून स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक एडव्होकेट. निखिल बुरबुरे, जवान डिफेन्स करिअर अकादमीचे संचालक प्रवीण पेठे, अर्चना भोमले, हर्षल गजभिये उपस्थित होते. सकाळच्या शारीरिक परेड मध्ये प्रवीण पेठे, ऑल इंडिया समता सैनिक दलाचे मेजर सुभाष गायकवाड ७३ मुलींना व ४० मुलांना प्रशिक्षण देत होते. दुसऱ्या दिवशी प्राचार्य संदीप काळे यांनी राजकीय सामाजिक घडामोडीवर , डॉ.सचिन पावडे यांनी स्वच्छता, आरोग्य व पर्यावरण, एड. अर्चना वानखेडे यांनी कायदेविषयक मार्गदर्शन केले. तिसऱ्या दिवशी डॉ.महेश कोंबे यांनी यूपीएससी ,एमपीएससी या विषयावर, डॉ. अशोक चोपडे यांनी बौद्धिक मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक एड.निखिल बुरबुरे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची माहिती दिली तर स्वतंत्र समता शिक्षक संघ वर्धा चे गौतम पाटील , ऑल इंडिया समता सैनिक दलाचे प्रदेश सदस्य अनिल खडतकर यांनी व्यक्तिमत्व विकास या विषयावर मार्गदर्शन केले. समारोपीय कार्यक्रमांमध्ये विदर्भ सचिव रमेश निमसडकर , ऑल इंडिया समता सैनिक दलाचे कार्यकारी सदस्य सुनील बाभळे, अरविंद माणिककुळे , प्रतिभा कांबळे, हर्षल गजभिये, अर्चना भोमले यांनी विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन गौतम पाटील व आभार समता सैनिक दलाचे मेजर सुभाष गायकवाड यांनी केले. शेवटच्या दिवशी परेड पायलटिंग व व मिल्ट्री ट्रेनिंग ने कार्यक्रमाची सांगता झाली.

भारतीय कम्युनिस्ट पार्टी द्वारा कार्ल मार्क्सची २०७ वी जयंती मोठ्या उत्साहात

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : भारतीय कम्युनिस्ट पार्टीच्या नागपुर इकाई द्वारा विश्व विख्यात दार्शनिक कार्ल मार्क्स ची २०७ वीं जयंती त्यांच्या गणेशपेठ स्थित कार्यालयात साजरी करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष कॉ. महादेव खुड़े यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. नागपुरचे थोर परिचित मार्क्सवादी विचारक डॉ. युगल रायलु या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते होते. भाकपाचे नागपुर सचिव कॉ. संजय राउत यानी कार्यक्रमाचे संचालन केले. कार्यक्रमाची सुरुवात कार्ल मार्क्स च्या फोटो ला माल्यार्पण करून सर्व उपस्थितांच्या हस्ते पुष्पांजली अर्पण करण्यात आली. प्रभावी भाषणात डॉ. युगल रायलु यानी कार्ल मार्क्स द्वारा जगाच्या कष्टकरी वर्गाच्या मुक्तिसाठी केलेल्या ऐतिहासिक एवं क्रांतिकारक कार्यावर प्रकाश टाकला. ते म्हणाले, मार्क्स नी इतिहासात पहिल्यांदा शेतकरी आणि मजूर यांच्यावर होणा-या शोषणाच्या कारणाच्या शोध केला. मार्क्सनी शेतकरी आणी मजूरांच्या मुक्तिचा मार्ग पण सांगितला. शेवटी रायलू म्हणाले ' जगातील कष्ट कारांनो एकत्रित व्हा. गमवण्या करीता तुमच्या जवळ काही नाही, जिंकण्यासाठी पूर्ण जग आहे!' हा घोष वाक्य जग प्रसिद्ध झालेला आहे, हीच मार्क्स ला खरी श्रध्दांजली आहे. अध्यक्षीय भाषणात कॉ. महादेव खुड़े यानी कार्ल मार्क्स यांना इतिहास पुरुष म्हटले आणि त्यांना श्रध्दांजली दिली. यावेळी डॉ. रायलू द्वारा लिखित पुस्तिका 'मार्क्सवाद' चा विमोचन करण्यात आले. सचिव कॉ. गजानन घोड़े यांनी आभार मानले. कॉ. रविंद्र परांते आणि कॉ. दास आनंदम यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242